कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | सोमवार | दि. १६ नोव्हेंबर २०२६ | अंक १६० | पृष्ठ ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in



‘रामलीला’ नियमांच्या कचाट्यात?

नवी दिल्ली : दिल्ली पोलिसांनी रामलीला मैदानावरील आंदोलनांचे नियमन करण्यासाठी नवी आदर्श संचालन प्रक्रिया तयार केली आहे. प्रस्तावित मसुदा अंतिम मंजुरीसाठी दिल्ली पोलीस मुख्यालयात पाठवण्यात आला आहे. गेल्या महिन्यात १२ ऑक्टोबर रोजी जंतर-मंतरचा आंदोलनासाठीचा अधिकृत दर्जा रद्द करून रामलीला मैदान, बुराडी ग्राउंड आणि सीबीडी ग्राउंड हे पर्यायी स्थळ म्हणून घोषित करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर, आंदोलनाचा अधिकार आणि सामान्य नागरिकांची सोय यांत समतोल राखण्यासाठी हा नवा मसुदा तयार करण्यात आला आहे. रामलीला मैदानासंबंधीची •>पान २ वर

वे|ध|क

सीएनजीचे दर वाढले

मुंबई : इंधन दरवाढीमुळे वाहनचालकांचे आर्थिक गणित बिघडले असतानाच आता सीएनजीच्या दरातही वाढ करण्यात आली आहे. महानगर गॅस लिमिटेडने सीएनजीच्या दरात प्रतिकिलो १ रुपये ५० पैशांची वाढ केली आहे. त्यामुळे मुंबई आणि आसपासच्या परिसरात सीएनजीचा दर प्रतिकिलो ९१ रुपये ५० पैसे झाला आहे. ही दरवाढ दि.१४ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून लागू झाली आहे. महानगर गॅस लिमिटेडने आंतरराष्ट्रीय बाजारातील परिस्थिती आणि नैसर्गिक वायूच्या वाढलेल्या किमतींमुळे दरवाढीचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले आहे. सीएनजीच्या दरवाढीचा सर्वाधिक फटका रिक्षा आणि टॅक्सीचालकांना बसण्याची शक्यता आहे. आधीच वाढत्या इंधन खर्चामुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या चालकांना आता सीएनजीसाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत.

पुनर्विकासासाठी १२८ झाडांवर कुऱ्हाड

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) रेल्वे स्थानकाच्या प्रस्तावित पुनर्विकास प्रकल्पात परिसरातील तब्बल १२८ झाडे बाधित होणार आहेत. यापैकी ५६ झाडे तोडण्यात येणार असून, ७२ झाडांचे अन्यत्र पुनर्रोपण केले जाणार आहे. या वृक्षतोडीला आणि पुनर्रोपणाला मुंबई महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीने शुक्रवारी (दि.१३) मंजुरी दिली. तोडण्यात येणाऱ्या झाडांच्या बदल्यात १५ दिवसांत २ हजार ४६३ नवीन झाडे लावण्याचे नियोजन केले आहे. मात्र, यापूर्वी विकासकामांसाठी तोडलेल्या झाडांच्या बदल्यात करण्यात आलेली वृक्षलागवड प्रत्यक्षात कुठे आहे, असा सवाल उपस्थित करीत विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी प्रशासनाला धारेवर धरले.

बीडमध्ये दिवसा महिलेचं अपहरण

बीड : जिल्ह्यातील गुन्हेगारी हा सातत्याने चर्चेचा आणि पोलिसांना आव्हान देणारा विषय ठरत आहे. गेल्या दोन वर्षांपासून बीडमध्ये सातत्याने गंभीर गुन्ह्याच्या घटना घडत आहेत. त्यातच, आता बीड शहरालगतच्या चऱ्हाटा फाटा परिसरातून भरदिवसा एका ३५ वर्षीय महिलेचे अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दोन गाड्यांमधून आलेल्या चौघांनी महिलेच्या घरात घुसून तिला आणि तिच्या दोन मुलांना मारहाण केली. मुलांना जीवे मारण्याची धमकी देत महिलेला बळजबरीने गाडीत डांबून पळवून नेल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलिसांनी शिरूर कासार तालुक्यातील रायमोहा परिसरातून महिलेची आरोपींच्या तावडीतून सुटका केली.

रायगड पोलिसांना मिळणार हक्काची घरे

आ. बाबासाहेब देशमुख यांचा पाठपुरावा

३८० निवासस्थानांच्या प्रकल्पाला गती मिळण्याची आशा

शेकापच्या मागणीला मोठे यश



। मुंबई । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील पोलीस मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वतःची हक्काची निवासस्थाने उपलब्ध करून द्यावीत, अशी महत्त्वपूर्ण मागणी शेतकरी कामगार पक्षाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या सभागृहात केली होती. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि.२६ ऑक्टोबर रोजी लेखी उत्तर दिले असून, रायगड पोलीस मुख्यालय येथे तब्बल ३८० निवासस्थाने बांधण्याच्या प्रकल्पाचा शासनाच्या मंजूर प्राधान्यक्रम यादीत समावेश असल्याची महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे.

मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या लेखी उत्तरानुसार, गृह विभागाच्या दि.६ फेब्रुवारी २०२३ रोजी मंजूर करण्यात आलेल्या प्राधान्यक्रम यादीमध्ये रायगड पोलीस मुख्यालय येथे ३८० निवासस्थाने बांधण्याच्या प्रकल्पाचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या माध्यमातून नवीन चटई क्षेत्रफळानुसार संकल्पन नकाशे व आराखडे तयार करण्याचे काम सध्या प्रगतीपथावर असल्याचेही लेखी उत्तरात स्पष्ट करण्यात आले आहे.

पोलीस अधिकारी आणि कर्मचारी हे दिवस-रात्र जनतेच्या सुरक्षिततेसाठी कर्तव्य बजावत असतात. मात्र, अनेकदा त्यांना निवासाच्या समस्यांना सामोरे जावे लागते. कुटुंबासह सन्मानाने राहण्यासाठी हक्काचे घर उपलब्ध होणे ही त्यांची रास्त अपेक्षा आहे. ही बाब लक्षात घेऊन आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी विधिमंडळात •>पान २ वर

बचाव समितीचे कॅण्डल मार्च

। नेरळ । प्रतिनिधी ।



कर्जत तालुक्यातील पाली येथील सायडोंगर धरण प्रकल्प रद्द व्हावा, यासाठी दि.२२ नोव्हेंबर रोजी तालुक्यात एकाच वेळी सर्वत्र कॅण्डल मार्च काढला जाणार आहे. कर्जत पर्यावरण बचाव समिती आणि शिवसेना ठाकरे गट यांनी सह्याद्री बचाव मोहीम हाती घेतली असून, पाली सायडोंगर येथील प्रकल्प रद्दच झाला पाहिजे, अशी हाक मोर्चाच्या दरम्यान दिली जाणार आहे.

साई डोंगर प्रकल्प रद्द आणि सह्याद्री बचाव मोहीमेअंतर्गत कर्जत बंद यशस्वी झाल्यानंतर कर्जत पर्यावरण बचाव समिती आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने सोबत कर्जत तालुक्यात एकाच दिवशी कॅण्डल मार्च काढण्याचा निर्धार जाहीर केला आहे. कर्जत तालुक्यातील साईडोंगर येथील प्रकल्प रद्द आणि सह्याद्रीचे नैसर्गिक सौंदर्य, वनसंपदा, जैवविविधता आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी तसेच टोरंटखटाव प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी सह्याद्री बचाव मोहीम व कॅण्डल मार्च आयोजित करण्यात येत आहे.

या मोहिमेत सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, विविध संस्था, युवक मंडळे, महिला मंडळे, पर्यावरणप्रेमी आणि जनतेने मतभेद बाजूला ठेवून निसर्गाच्या रक्षणासाठी एकत्र यावे आणि मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे जाहीर आवाहन कर्जत पर्यावरण बचाव समितीच्यावतीने करण्यात आले ओहे. या मोहिमेदरम्यान कशेळे, कळंब, कडाव, कर्जत आणि नेरळ या मार्गावर सह्याद्री आणि साई डोंगराच्या संरक्षणासाठी जनजागृती करण्यात येणार आहे.

ज्ञानी ॲग्रो प्रोड्युसर कंपनीचा शुभारंभ



। रायगड । प्रतिनिधी ।

शेकापचे जयंत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

एकीकडे रायगड जिल्ह्यात औद्योगिक क्रांती होत आहे. तर, दुसरीकडे भातशेती राखून विभाग कृषिप्रधान करण्याचे काम शेतकरी करीत आहेत. शेतीप्रधान उद्योग उभारण्यासाठी रामराज विभागातील ज्ञानी तरुण शेतकऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. त्यांनी शेतीपूरक उद्योगामध्ये अग्रगण्य असणारी भात गिरणी उभारून शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर दर्जेदार काम करून शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण भाताची भरडाई करून देण्याचा संकल्प ज्ञानी ॲग्रो प्रोड्युसर कंपनीने करावा, असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले. ज्ञानी ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड या कंपनीच्या राईस मिलचा शुभारंभ सोहळा रविवारी (दि.१५) जयंत पाटील यांच्या हस्ते पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, द्वारकानाथ नाईक, मोहन धुमाळ, मानसी धुमाळ, अनिल पाटील, विक्रांत वार्डे, प्रमोद घासे, नौशाद मुजावर, अलिबाग कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अनंत पाटील, रायगड •>पान २ वर

कळंबोलीतील गोदामाला भीषण आग

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।



दोघेजण जखमी

कळंबोली येथील लोखंड आणि पोलाद बाजार परिसरातील एका गोदामाला शनिवारी (दि.१४) रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. तब्बल चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन दलाला यश आले असून, या दुर्घटनेत अग्निशमन दलाच्या जवानासह परिसरातील एक व्यक्ती जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कळंबोली येथील लोखंड आणि पोलाद बाजार परिसरातील एका अनधिकृत गोदामाला शनिवारी रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलासह कळंबोली, नवीन पनवेल आणि सिडकोच्या खारघर येथील अग्निशमन दलाचे एकूण सात अग्निशमन बंब आग विझविण्यासाठी तैनात करण्यात आले. तब्बल चार •>पान २ वर

अग्निसुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

कळंबोलीतील गोदामाला लागलेल्या आगीने औद्योगिक आणि व्यापारी गोदामांमधील अग्निसुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. थिनरसारखे अत्यंत ज्वलनशील रसायन मोठ्या प्रमाणात साठवताना आवश्यक परवानग्या आणि सुरक्षित साठवणूक व्यवस्था असणे बंधनकारक आहे. मात्र, संबंधित गोदामात या नियमांचे पालन झाले होते का, याची तपासणी होणे आवश्यक आहे. गोदामातील साठ्याची क्षमता, रसायनांचे स्वरूप आणि अग्निशमन यंत्रणेची उपलब्धता यांची पाहणी करून संबंधित यंत्रणांनी वस्तुस्थिती स्पष्ट करावी. अन्यथा अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नगरसेविका स्नेहा आंब्रे यांचे निधन

। चणेरा । प्रतिनिधी ।



रोह्याच्या विद्यमान नगरसेविका, स्पंदन नाट्य संस्था आणि सखी मंचच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, सामाजिक कार्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात सदैव अग्रेसर असणाऱ्या स्नेहा आंब्रे यांचे शनिवारी (दि.१४) निधन झाले. स्नेहा आंब्रे पूर्वाश्रमिच्या मनिषा देशमुख यांनी आपले वडील व्ही. टी. देशमुख यांच्याकडून राजकीय-सामाजिक कार्याचे बाळकडू घेतले. त्यासोबत त्यांच्या आई सुमन देशमुख या मेहेंदळे शिक्षिका असल्यामुळे त्यांच्याकडून सांस्कृतिक क्षेत्राची आवड जोपासली. त्याचा प्रत्यय त्यांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आजवरच्या वाटचालीत वेळोवेळी जाणवून आला. त्यांचे पती शिरीष आंब्रे, त्यांचे मोठे बंधू संदीप देशमुख व छोटे बंधू न्यायाधीश सचिन देशमुख यांनी त्यांच्या प्रत्येक कार्यात त्यांना सहकार्य व प्रोत्साहन दिले. त्यामुळे त्या सर्व क्षेत्रात यशस्वी झाल्या असल्याचे त्या वारंवार अभिमानाने सांगत असत. स्नेहा आंब्रे यांच्या जाण्याने रोह्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक विश्वातील एक खंबीर, कर्तृत्ववान आणि लढवय्ये व्यक्तिमत्त्व हरपले आहे. महिलांना एकत्र आणून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण •>पान २ वर

पालीत नगरपंचायतीचा अजब कारभार

पाणी कपातीच्या सल्ल्यालाच हरताळ; हजारो लिटर पाणी वाया

। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।



● (छायाचित्रः गौसखान पठाण)

पाली नगरपंचायत हद्दीतील पाली-खोपोली महामार्गालगत असलेल्या भाग्यश्री प्लाझा इमारतीच्या अगदी समोर नगरपंचायतीला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीला गळती लागली आहे. ही गळती गेल्या अनेक दिवसांपासून लागली असून, हजारो लिटर पाणी रस्त्यावर वाहून वाया जात आहे. विशेष म्हणजे, या गळतीबाबत वारंवार तक्रारी करूनही अद्याप दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याने नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दोन दिवसांपूर्वीच पाली नगरपंचायतीने दर मंगळवारी पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा अर्थात पाणी कपातीचा निर्णय जाहीर केला. भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी पाण्याचे नियोजन करणे आणि नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करणे निश्चितच आवश्यक आहे. मात्र, नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन करणाऱ्या नगरपंचायतीने आधी स्वतःच्या व्यवस्थेकडे पाहण्याची गरज नाही का? पाणीटंचाईचे कारण पुढे करून नागरिकांवर कपातीचा निर्णय लादण्यापूर्वी नगरपंचायतीने •>पान २ वर

अर्बन बँक संघर्ष समितीची बैठक

निर्णायक लढाई कायम राहण्याचा विश्वास



। नेरळ । प्रतिनिधी ।

पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेच्या खातेदारांचा संवाद मेळावा खोपोली येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी बँकेच्या ठेवीदारांच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष सुरूच राहणार असल्याचा विश्वास ठेवीदारांना देण्यात आला. तसेच, निर्णायक यश मिळेपर्यंत आपली लढाई कायम राहील, असा निर्धार या बैठकीत करण्यात आला.

पेण अर्बन बँक संघर्ष समितीच्यावतीने सहकार विभागाने घेतलेल्या निर्णयाची माहिती देण्यासाठी संवाद बैठक आयोजित केली होती. यावेळी समितीच्या पदाधिकाऱ्यांसह उपस्थित मान्यवरांनी पुढील लढ्याची दिशा आणि ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत आपली मते मांडली. •>पान २ वर

कशेडी घाटात टेम्पो कलंडला

■ वाहनावरील ताबा सुटल्याने अपघात

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटातील धामणदिवी गावच्या हद्दीत रविवारी (दि.१५) पहाटेच्या सुमारास एका टाटा कंपनीचा मालवाहू टेम्पो कलंडल्याची घटना घडली. या अपघातात वाहनाचे नुकसान झाले असून, चालक आणि क्लीनर बचावल्याची माहिती समोर आली आहे. यादरम्यान, या मार्गावरील एकेरी वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, टेम्पोचालक संचित साबळे (२६) हा कोल्हापूरवरून मुंबई दिशेने जात होता. तो पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटातील धामणदिवी गावाच्या हद्दीत आला असताना त्याचा टेम्पोवरील ताबा सुटला आणि टेम्पो एका तीव्र वळणावर लोखंडी गर्डरला धडक देऊन कलंडला. त्यामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. अपघाताची माहिती मिळताच पोलादपूरचे पोलीस हवलदार रंजेश पवार व कशेडी महामार्गाचे पोलीस टॅपचे सहाय्यक फौजदार राजन माजलकर यांनी घटनास्थळी जाऊन तात्पुरती एकेरी वाहतूक केली. त्यानंतर क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त टेम्पो महामार्गावरून बाजूला करून वाहतूक पुर्ववत सुरळीत करण्यात पोलिसांना यश आले. सुदैवाने या अपघातात चालक आणि क्लीनर यांना कोणतीही दुखापत झाली नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

पक्षी निरिक्षकांसह पर्यटक सुखावले | पर्यटन वाढीलाही चालना मिळणार

जिल्ह्यात स्थलांतरित पाहुण्यांची रेलचेल

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

थंडीच्या हंगामात हजारो किलोमीटरचा प्रवास करून विविध देशी व विदेशी स्थलांतरित पक्षी रायगड जिल्ह्यात दाखल होतात. मागील काही दिवसांपासून वातावरण अनुकूल झाले असून, थंडीही चांगली पडू लागली असल्याने स्थलांतरीत व स्थानिक पक्षांची रेलचेल सुरु झाली आहे. त्यामुळे पक्षी अभ्यासक, निरीक्षक व पर्यटक सुखावले आहेत. तसेच, यामुळे पर्यटन वाढीला देखील चालना मिळत आहे.



गुलाबी थंडीची चाहूल लागल्याने निसर्गरम्य रायगड जिल्ह्यात परदेशी आणि काही स्थानिक स्थलांतरित पक्षांची रेलचेल पाहायला मिळत आहे.

स्थानिक पक्षी

पॅराडाईज फ्लाय कॅचेर (स्वर्गीय नर्तक), इंडियन रोलर (भारतीय तास पक्षी), श्राईक (खाटीक), युरेशियन हुपू (हुदहुद), क्रेस्टेड बंटींग (युवराज).

> जिल्ह्यात ४०० हून अधिक पक्षी प्रजातींची नोंद आहे. स्थलांतरित पक्ष्यांसाठी येथे अनेक प्रकारचे पोषक नैसर्गिक अधिवास आहेत. त्यामुळे चांगल्या संख्येने पक्षी दाखल होतात. समुद्रकिनारे, पाणथळीचे प्रदेश, घनदाट जंगले, माळरावने अशा अधिवासांमध्ये विविध प्रकारच्या पक्षी प्रजाती जिल्ह्यात थंडीच्या मोसमात येतात. पक्षी निरीक्षक आणि छायाचित्रकारांसाठी ही गुलाबी थंडी पर्वणीच असते.
>
> **– शंतनु कुवेसकर,** पक्षी व वन्यजीव अभ्यासक, माणगाव

परदेशी पक्षी

ब्ल्यू थ्रोट (शंकर), युरोपियन रोलर (तास पक्षी), युरेशियन रायनेक (मानमोडी), सायबेरियन स्टोनचाट (गप्पीदास पक्षी), बंटिंग्स (भारीट पक्षी), पॅलिड हॅरिअर (पांढूरका भोवत्या).

आॅक्टोबर हिट व अवकाळी पाऊस अशा हवामानातील बदलामुळे स्थलांतरित पक्षांसाठी पोषक परिस्थिती नव्हती. आता मात्र थंडीच्या आगमनास सुरुवात झाली असल्याने स्थलांतरित पक्षी दाखल होत आहेत. या पक्षांचे दर्शन जिल्ह्यातील समुद्रकिनारे, दलदलीच्या जागा, जंगले, भातशेती, खाड्या तसेच गवताळ प्रदेशात होत आहे. हे पक्षी वाढलेल्या गवतांमधील आणि साठलेल्या जलाशयामधील कीटक, कीडे, कृमी, मृदुकाय जीव-जंतू खाण्यासाठी, तसेच समुद्रकिनारे आणि दलदलीच्या भागातील छोटे खेकडे, मृदुकाय प्राणी, मासे, जल कीटक हे खाऊन पर्यावरणाचे संरक्षण व जैवविविधता समृद्ध करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्यामुळे ही पक्षी अभ्यासक, निरीक्षक तसेच पर्यटकांनाही मोठी •>पान २ वर

झुगरेवाडी शाळेचा राष्ट्रीय स्तरावर बोलबाला

■ एनसीईआरटी कार्यशाळेसाठी रवी काजळेंची निवड; ठाकूर-कातकरी बोलीभाषेतील लोकगीताची जबाबदारी

| नेरळ | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात आपल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या झुगरे वाडीतील राजिप प्राथमिक उच्च प्राथमिक शाळेच्या शिरपेचात पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावरील मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाराष्ट्र राज्यातील आदिम जनजातींच्या बोलीभाषेतील लोकगीते, बालगीते आणि बडबडगीतांचे संकलन व पुस्तकनिर्मिती या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय उपक्रमासाठी झुगरे वाडी शाळेचे मुख्याध्यापक रवी काजळे यांची निवड करण्यात आली आहे.



राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदची राष्ट्रीय कार्यशाळा नुकतीच भोपाळ-मध्यप्रदेश येथे आयोजित करण्यात आली होती. आदिम बोलीभाषांच्या जतनासाठी राष्ट्रीय स्तरावर महत्त्वपूर्ण योगदान असलेल्या महाराष्ट्रातील ठाकूर आणि कातकरी या आदिम जनजातींच्या बोलीभाषा, त्यांची समृद्ध मौखिक परंपरा, लोकसंस्कृती, लोकगीते, बालगीते आणि बडबडगीते यांचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. काळाच्या ओघात अनेक आदिम बोलीभाषा लोप पावण्याच्या मार्गावर आहेत. या भाषांमधील पारंपरिक ज्ञान, लोकसाहित्य, संस्कृती आणि मौखिक वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावा, या व्यापक उद्देशाने राष्ट्रीय स्तरावर हा उपक्रम राबविण्यात येत आहे. दरम्यान, भोपाळ येथे झालेल्या या कार्यशाळेत कर्जत तालुक्यातील झुगरेवाडी शाळेने पुन्हा एकदा राष्ट्रीय शैक्षणिक व्यासपीठावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. यावेळी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करताना रवी काजळे यांनी ठाकूर आणि कातकरी बोलीभाषेतील विविध लोकगीते, बालगीते आणि पारंपरिक बडबड गीतांच्या संकलन आणि लेखन प्रक्रियेत महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला.विशेष म्हणजे, त्यांच्या यापूर्वी प्रकाशित झालेल्या ठाकरी भाषेतील पुस्तकातील निवडक बालगीतांचाही या राष्ट्रीय पुस्तकनिर्मिती उपक्रमात समावेश करण्यात येणार आहे.

ग्रामस्थांचा सहभाग

या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे केवळ शिक्षक किंवा तज्ज्ञांपुरते मर्यादित न राहता स्थानिक समाजातील ज्येष्ठ व्यक्ती, महिला आणि लोकपरंपरेचे जाणकार यांनाही या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात आले आहे.

आदिवासी आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे, शिक्षण आनंददायी आणि कृतीशील बनविणे आणि शाळेला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र बनविणे यासाठी त्यांनी सातत्याने विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच त्यांच्या मातृभाषेचा सन्मान, स्थानिक संस्कृतीची ओळख आणि परिसरातील लोकपरंपरांचा शिक्षणाशी संबंध जोडण्याचा त्यांचा प्रयत्न नेहमीच उल्लेखनीय राहिला आहे. त्यामुळे झुगरेवाडी शाळा ही केवळ शिक्षण देणारी शाळा न राहता स्थानिक संस्कृती, लोकसाहित्य आणि शैक्षणिक नवोपक्रम यांचा सुंदर संगम बनली आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील शाळाही आपल्या कल्पकतेच्या, गुणवत्तेच्या आणि सामाजिक बांधिलकीच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवू शकतात, हे या यशाने सिद्ध केले आहे.

बोली भाषेतून शिक्षण

झुगरेवाडी गावातील स्थानिक लोकपरंपरा, बोलीभाषा आणि शालेय गीतांनाही राष्ट्रीय स्तरावर स्थान मिळणार आहे. शाळेच्या स्वतःच्या गीतांचाही या पुस्तकात समावेश होणार असल्याने झुगरे वाडी शाळेच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर नोंद होणे ही अत्यंत अभिमानाची बाब ठरणार आहे.



डिजिटल मार्केटिंग अभ्यासक्रमांचे उद्घाटन

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

बदलत्या काळानुसार रोजगाराच्या संधी मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांकडे शैक्षणिक पात्रतेसोबतच संवादकौशल्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. हीच गरज ओळखून रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी 'स्पोकन इंग्लिश' आणि 'आर्टिफिशियल इंटेलिजन्ससह डिजिटल मार्केटिंग' या दोन कौशल्य विकास अभ्यासक्रमांचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. महाविद्यालयाने वॉच फाऊंडेशन यांच्यासोबत केलेल्या सामंजस्य करारांतर्गत हे अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत. जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाच्या (जेएनपीए) कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमातून विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण पूर्णपणे विनामूल्य दिले जाणार आहे. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, ममाली गांगुली, प्रा. भूषण ठाकूर, प्रा. प्रांजल भोईर यांची उपस्थिती होती. या उपक्रमाला महाविद्यालयातील सुमारे ८० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन

| पनवेल | प्रतिनिधी |

आदिवासी समाजाचे महानायक, स्वातंत्र्यसैनिक आणि जननायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त रविवारी (दि.१५) पनवेल महानगरपालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बिरसा मुंडा यांनी ब्रिटिशांच्या अन्यायकारक राजवटीविरोधात आदिवासी समाजाला संघटित करून संघर्ष केला. त्यांनी आदिवासींच्या जल, जंगल आणि जमिनीवरील हक्कांसाठी लढा दिला. १८९९-१९०० मध्ये त्यांनी उभारलेला मउलगुलानफ अर्थात महान उठाव हा ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या आदिवासी प्रतिकाराचा महत्त्वपूर्ण अध्याय ठरला. महानगरपालिका मुख्यालयात आयोजित या कार्यक्रमात प्रभाग समिती मडफ्चे सभापती अजय बहिरा, सामान्य प्रशासन विभागप्रमुख कीर्ती महाजन, लिपिक विष्णू सांगळे, अग्निशमन दलाचे कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच नागरिक उपस्थित होते.



आदिवासी वाडीत जयंती साजरी

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

खिडुकपाडा आदिवासी वाडी येथे बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त परिसरातील आदिवासी बांधवांना दिवाळी फराळाचे वाटप करून दिवाळीचा आनंद त्यांच्यासोबत साजरा करण्यात आला. यावेळी प्रमिला पाटील, अमर पाटील, रवींद्र भगत, बबन बारगजे, राजेंद्र शर्मा, सरस्वती काथारा, दमयंती भोईर, शशिकांत शेळके, महादेव मधे, दिलीप बीस्ट, निलेश भोईर, संजय सरगर आदी उपस्थित होते.



छट पूजेसाठी उत्तर भारतीय महिला आणि पुरूषांनी अलिबाग समुद्रकिनारी गर्दी केली होती. दिवस मावळायच्या आधी त्यांनी मनोभावे ही पूजा केली. (छायाचित्र : समीर मालोदे)

मत्स्यव्यवसाय विभागाची धडक कारवाई

| रायगड | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्याच्या सागरी क्षेत्रात अनधिकृत व अवैध मासेमारीला आळा घालण्यासाठी म त्स्यव्यवसाय विभागाने काशिद समोरील जलधिक्षेत्रात गस्तीदरम्यान एलईडी दिवे व जनरेटरच्या साहाय्याने मासेमारी करणाऱ्या नौकेवर धडक कारवाई करून नौकेसह साहित्य व जनरेटर जप्त करण्यात आले.

रायगड जिल्ह्याच्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या गस्ती नौकेद्वारे समुद्रात गस्त सुरू असताना, विभागाच्या मा.आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, मा.अतिरिक्त आयुक्त मत्स्यव्यवसाय (योजना), सहआयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय रायगड-अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, (परवाना अधिकारी) मुरुड-जंजिरा स्वप्निल दाभणे यांनी ही कारवाई केली. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन दिवे व जनरेटरच्या साहाय्याने अनधिकृत मासेमारी करण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या नामदेव कावळे यांच्या मालकीच्या साईरत्न व हितेंद्र डबरी यांच्या मालकीची विना नोंदणीकृत नौकेवर कारवाई करण्यात आली. कारवाई दरम्यान साईरत्न या नौकेवर एकूण ८ फोकस, ३ पाण्याखालील दिवे व १ जनरेटर तसेच विना नोंदणीकृत नौकेवरती एकूण १७ फोकस, २ पाण्याखालील दिवे, १ जनरेटर जप्त करण्यात आले.

वाढदिवसानिमित्त साई डोंगरात वृक्षारोपण

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जतमधील साईडोंगरात प्रास्तवित टोरंट प्रकल्पासाठी वनविभागाने पायघड्या घालत वृक्षतोड केली. शेकडो झाडांची कत्तल झालेली पाहत महाराष्ट्रातून प्रचंड संताप निर्माण झाला. पर्यावरण प्रेमींनी साईडोंगराकडे धाव घेतल्याने अखेरीस प्रशासनाने हि वृक्षतोड थांबवली.

मात्र यामुळे जंगलाची मोठ्या प्रमाणात हानी झाली. प्राणी, पक्षी यांची घरे संसार उध्वस्त झाले. तेव्हा जंगलाची हानी भरून काढण्यासाठी मनसे रेल्वे कामगार सेनेचे अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी एक पाऊल पुढे टाकले आहे.



रविवार (दि.१५) नोव्हेंबर यादिवशी जितेंद्र पाटील यांनी त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत एक झाड सह्याद्रीच्या कुशीत हा उपक्रम पाटील यांनी हाती घेतला. पर्यावरण प्रेमी आणि मनसे सैनिकांना सोबत घेऊन त्यांनी वृक्षतोड झालेल्या ठिकाणी पुन्हा वृक्ष लागवड केली आहे.

धगडवाडीत गायींची विधीवत पूजा

| सुतारवाडी | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील धगडवाडी येथील कृष्ण भट यांच्या गोशाळेत श्रीराम चंद्रपूर मठाचे गोकर्ण मंडळाधीश्वर राधेश्वर भारती महास्वामीजी यांच्या आशीर्वादाने दरवर्षी गोपूजन सोहळा आयोजित केला जातो. यंदाही गोशाळेतील सुमारे २०० गायींची विधिवत पूजा करून त्यांना गोग्रास भोजन देण्यात आले. यावेळी गायींसाठी तांदूळ, भुसा, केळी, मुगाची खीर, गूळ इत्यादी पदार्थ एकत्र करून विशेष भोजन तयार करण्यात आले होते. गोमातेची पूजा करून तिची सेवा करण्याचा धार्मिक उपक्रम भक्तिभावाने पार पडला. याप्रसंगी महाराष्ट्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृष्ण भट, विजया भट, विश्वस्त प्रकाश भट, ईश्वरी भट, सचिव ज्योती भट, रिद्धिमा भट यांच्यासह मुंबई, ठाणे आणि अन्य शहरांतील गोसेवक व मान्यवर उपस्थित होते.



संदेश बेडेकरांचे १०२ वे रक्तदान

| अलिबाग | प्रतिनिधी |

गेल्या चार दशकांहून अधिक काळ सातत्याने रक्तदान करणारे अलिबाग येथील सामाजिक कार्यकर्ते संदेश बेडेकर यांनी रविवारी (दि.१५) आपले १०२ वे रक्तदान पूर्ण केले. त्यांच्या या उल्लेखनीय कार्यामुळे सामाजिक बांधिलकी, माणुसकी आणि सेवाभावाचा आदर्श समाजासमोर निर्माण झाला आहे. बेडेकर यांच्या रक्तदान कार्याची सुरुवात १९८५ साली झाली. त्यावेळी ओळखीच्या व्यक्तीच्या वडीलांना रक्ताची गरज असल्याने त्यांनी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये जाऊन रक्तदान केले. येथूनच त्यांच्या रक्तदानाच्या सामाजिक प्रवासाला सुरुवात झाली. त्या काळात रक्तदानाबाबत जनजागृती कमी असल्याने रक्ताची गरज असलेल्या अनेक रुग्णांचे नातेवाईक बेडेकर यांच्याशी संपर्क साधू लागले. रविवारी चौल-बागमळा येथील आझाद मित्रमंडळ तसेच डॉ. केदार ओक यांच्यासह अनेक संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते त्यांच्या या जीवनदानाच्या कार्यात सहभागी होत आहेत. विविध संस्थांच्या सहकार्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन करून रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना मदतीचा हात दिला जात आहे.



पान १ वरुन

रायगड पोलिसांना मिळणार हक्काची घरे

हा प्रश्न ठामपणे उपस्थित केला होता. या मागणीला मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे रायगड पोलीस मुख्यालयातील ३८० निवासस्थानांच्या प्रकल्पाला गती मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, पोलीस विभागाच्या निवासी व अनिवासी बांधकाम प्रकल्पांची कामे मंजूर प्राधान्यक्रमानुसार आणि निधीच्या उपलब्धतेनुसार महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत हाती घेण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

शेतकरी कामगार पक्षाने सर्वसामान्यांचे, कष्टकरी जनतेचे तसेच शासकीय कर्मचाऱ्यांचे प्रश्न सातत्याने विधिमंडळात मांडण्याची परंपरा जपली आहे. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांचा प्रश्न सभागृहात उपस्थित करून त्यांच्या निवासाच्या हक्कासाठी आवाज उठवला. त्याची दखल घेत शासनाकडून ३८० निवासस्थानांच्या प्रकल्पाबाबत सकारात्मक माहिती लेखी स्वरूपात देण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना हक्काची घरे मिळण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल असून, शेतकरी कामगार पक्षाच्या मागणीला मिळालेले हे मोठे यश मानले जात आहे. आता या प्रकल्पाचे आराखडे पूर्ण होऊन प्रत्यक्ष बांधकाम लवकरात लवकर सुरू व्हावे आणि पोलीस बांधवांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

कळंबोलीतील गोदामाला भीषण आग

तासांच्या अथक प्रयत्नांनंतर मध्यरात्री अडीच वाजताच्या सुमारास आगीवर नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन दलाला यश आले. या दुर्घटनेत अग्निशमन दलाचे जवान विकास ठाकरे आणि परिसरातील महेंद्र कुमार गुप्ता हे दोघे जखमी झाले आहेत. या दोघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यानिमित्ताने अग्निशमन जवानांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न समोर आला आहे.

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, गोदामात मोठ्या प्रमाणात थिनर आणि रंगाचा साठा असल्याने आगीची तीव्रता अधिक वाढल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. थिनर हे अत्यंत ज्वलनशील रसायन असल्याने आग विझविण्याचे काम अग्निशमन जवानांसाठी आव्हानात्मक ठरले. या घटनेनंतर लोखंड आणि पोलाद बाजारातील गोदामांमध्ये अशा प्रकारच्या ज्वलनशील रसायनांचा साठा करण्यासाठी आवश्यक सुरक्षा नियमांचे पालन केले जाते का, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

जबाबदारी कोणाची?

अग्निशमन दलातील अधिकाऱ्यांनी खासगीत दिलेल्या माहितीनुसार, अशा दुर्घटना घडल्यानंतर साठवलेल्या साहित्याची जबाबदारी स्वीकारण्यासाठी संबंधितांकडून पुढाकार घेतला जात नाही. आग विझविण्यासाठी अग्निशमन जवानांना जीव धोक्यात घालून प्रयत्न करावे लागतात; मात्र, गोदामातील धोकादायक साठ्याची जबाबदारी नेमकी कोणाची, याचा शोध घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे संबंधित गोदाममालक आणि साठा करणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची गरज आहे.

ज्ञानी ॲग्रो प्रोड्युसर कंपनीचा शुभारंभ

जिल्हा मजूर फेडरेशन अध्यक्ष हेमंत ठाकूर, अलिबाग पंचायत समिती सदस्य अंजली पाटील, चंद्रकांत बामणे, बाळू पाटील, सुरेखा झावरे, जयवंत तांबडकर, अरविंद कुलकर्णी, गजानन नाईक, यशवंत भगत, अशोक खोत, महेंद्र विद्रे, अबुल मुजावर, नामदेव तांबडकर, युसूफ चोगले, सुनील पाटील, गंगाराम शेळके, महादेव पाटील, रघुनाथ पाटील, जयवंत शेळके, संदेश वावेकर, रमेश गुंड, भिकाजी पाटील, नवनीत पाटील, नदीम बेबन, गणेश मढवी, मधुकर ढेबे, राकेश पालकर, उत्तम रसाळ, रवींद्र पाटील, महेश झावरे, सुशील पाटील, सुधीर पाटील, अलिम पठाण, प्रदीप रसाळ, राजेंद्र झावरे, संतोष झावरे आदी परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

जयंत पाटील पुढे बोलताना म्हणाले की, अलिबाग तालुक्यातील बहुतांश परिसर प्रामुख्याने भातशेती करणारा परिसर आहे. शेतकरी बांधवांच्या कष्टाचे चीज व्हावे, त्यांच्या मालाला योग्य भाव आणि प्रक्रिया सुविधा आपल्याच गावात मिळावी, ही काळाची गरज आहे. पूर्वी धान्यावर प्रक्रिया करण्यासाठी शेतकऱ्यांना लांबच्या परिसरात जावे लागायचे, त्यामुळे वेळ आणि पैसा दोन्ही खर्च व्हायचे. आज ही आधुनिक भात गिरण आपल्याच गावात सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांची मोठी सोय होणार आहे. आजच्या तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता, शेतीपूरक व्यवसायाकडे आणि उद्योजकतेकडे वळणे अत्यंत गरजेचे आहे. मोहन धुमाळ यांनी ज्ञानी ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड नावाने भात गिरणी सुरू करून हे धाडसी पाऊल उचलून इतर तरुणांपुढे एक उत्तम आदर्श ठेवला आहे. स्थानिक पातळीवर असे उद्योग उभे राहिले, तर गावातील तरुणांना गावातच रोजगार उपलब्ध होईल आणि गावाची आर्थिक प्रगती होईल, असा मौलिक सल्ला जयंत पाटील यांनी दिला.

अशा प्रकारच्या ग्रामीण उद्योगांना आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या उपक्रमांना माझे नेहमीच पूर्ण सहकार्य राहील. या भात गिरणीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उत्तम आणि विश्वासार्ह सेवा द्या आणि या व्यवसायाची उत्तरोत्तर प्रगती करा, असे आवाहनही जयंत पाटील यांनी केले.

पेण अर्बन बँक संघर्ष समितीची बैठक

दि.२३ सप्टेंबर २०१० पासून सुरू असलेला हा संघर्ष आता जवळपास १६ वर्षांचा झाला आहे. या प्रदीर्घ लढ्यात अनेक चढ-उतार आणि संघर्षांचा सामना करावा लागला. रस्त्यावरची आंदोलने, खोपोली ते मंत्रालय असा मोर्चा, न्यायालयीन लढाई, तसेच राजकीय आणि प्रशासकीय स्तरावर विविध मान्यवरांच्या भेटीगाठी, बैठका आणि चर्चा अशा अनेक मार्गांनी ठेवीदारांच्या न्यायासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. या सोळा वर्षांच्या संघर्षानंतरही अद्याप अपेक्षित यश मिळालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. मात्र, दिवाळीच्या पूर्वसंध्येला उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे ठेवीदारांना निश्चितच काहीसा दिलासा मिळाला आहे; परंतु, हा कायमस्वरूपी तोडगा नाही. ठेवीदारांना त्यांच्या हक्काचे पैसे पूर्णपणे आणि न्याय्य पद्धतीने मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही. हा केवळ पैशांचा प्रश्न नाही, तर हजारो ठेवीदारांच्या आयुष्यभराच्या कष्टाची कमाई आणि त्यांच्या विश्वासाचा प्रश्न आहे. त्यासाठी लवकरच मुख्यमंत्री भेट घेऊन या गंभीर प्रश्नावर ठोस तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्याचे या बैठकीत निश्चित करण्यात आले.

पालीत नगरपंचायतीचा अजब कारभार

स्वतःच्या पाणीपुरवठा व्यवस्थेतील गळती, अपव्यय आणि त्रुटी दूर करणे अपेक्षित आहे. नागरिकांनी वेळेवर पाणीपट्टी भरायची, पाणी कपात सहन करायची आणि प्रशासनाने मात्र स्वतःच्या व्यवस्थेतील उघड्या त्रुटींकडे कानाडोळा करायचा, हे कितपत योग्य आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.दरम्यान, पाली नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन भाग्यश्री प्लाझासमोरील मुख्य जलवाहिनीची गळती त्वरित दुरुस्त करावी. तसेच, गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या पाणीगळतीची दखल घेण्यात विलंब का झाला, याची चौकशी करून संबंधित जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

जिल्ह्यात स्थलांतरित पाहुण्यांची रेलचेल

पर्वणीच आहे. उत्तर गोलार्धातील युरोप, रशिया आणि उत्तर अमेरिका यासारख्या देशात थंडीच्या दिवसात पडणाऱ्या बर्फामुळे जमिनीवरील भूभाग हा बर्फाने आच्छादलेला असतो. त्यामुळे पक्षांना खाद्य मिळणे कठीण होऊन जाते. म्हणून हे पक्षी विविध देशात स्थलांतर करून आपली उपजीविका भागवत असतात. तसेच, रायगड जिल्ह्यात पडणारी थंडी आणि पुरेशा प्रमाणात मिळणारे खाद्य, त्याचबरोबर योग्य अधिवास या सर्व कारणांमुळे या पक्षांना आपली घरटी बांधून पिल्लांचे संगोपन करणे सोपे जाते. म्हणून बऱ्याच स्थलांतरित पक्षांचा विणीचा काळ सुद्धा हाच असतो, असे कोलाड येथील पक्षी अभ्यासक सागर दहिंबेकर यांनी सांगितले.

'रामलीला' नियमांच्या कचाट्यात?

सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेबाबतही कठोर अटी घालण्यात आल्या आहेत. आयोजकांना वाहतूक पोलिसांच्या समन्वयाने वाहनतळ आणि गर्दीचे नियोजन करावे लागेल. रस्ते, पदपथ आणि रुग्णवाहिका किंवा अग्निशमन दलासारख्या आपत्कालीन सेवांचे मार्ग कोणत्याही परिस्थितीत अडवले जाणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल. तसेच बंदुका, तलवारी, भाले व धारदार वस्तूंवर बंदी असेल आणि ड्रोन उडविण्यासाठी पूर्वपरवानगी आवश्यक असेल. पेयजल, वैद्यकीय मदत आणि स्वच्छतेची जबाबदारीही आयोजकांची असणार आहे.

नगरसेविका स्नेहा आंब्रे यांचे निधन

करण्यासाठी आणि समाजासाठी त्यांनी केलेले कार्य कायम रोहेकरांच्या कायम स्मरणात राहील. त्यांच्या अंत्ययात्रेला राजकीय नेते, सर्व नगरसेवक, नातेवाईक व रोहेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खांदेश्वर सरोवरावर महिलांची गर्दी

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

पनवेलमधील खांदा वसाहत येथील खांदेश्वर सरोवर परिसरात रविवारी (दि.१५) छठ पूजेनिमित्त मोठ्या प्रमाणावर भाविकांनी गर्दी केली होती. या पूजेत उत्तर प्रदेश आणि बिहार राज्यातून आलेल्या उत्तर भारतीय कुटुंबांतील महिला, पुरुष आणि नागरिक मोठ्या संख्येनेसहभागी झाले होते. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिलांनी सायंकाळी अस्ताला जाणाऱ्या सूर्यदेवाची मनोभावे पूजा केली. छठ पूजेच्या निमित्ताने महिलांनी पूजेचे साहित्य, फळे, नारळ, ऊस आणि विविध प्रसादाचे साहित्य सजवून सरोवराच्या काठावर ठेवले होते. कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी, आरोग्यासाठी आणि संततीच्या दीर्घायुष्यासाठी महिलांनी श्रद्धेने छठी मातेची प्रार्थना केली.

पनवेल रेल्वे स्थानकात सुविधांचा अभाव

- महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिकाचे प्रचंड हाल
- फलाट शोधताना अडचणींचा सामना



दिशादर्शक फलकांची आवश्यकता

फलाटांवरील दिशादर्शक फलक, भुयारी मार्गातील सुलभ व्यवस्था, तिकीट खिडकी किंवा स्वयंचलित तिकीट यंत्रे तसेच दोन्ही बाजूंना सार्वजनिक वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

| पनवेल | प्रतिनिधी |

कोकण आणि मुंबईला जोडणारे महत्त्वाचे केंद्र असलेल्या पनवेल रेल्वे स्थानकात प्रवाशांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. कोकण रेल्वेतून पनवेल येथे उतरल्यानंतर मुंबईकडे जाणारी लोकल पकडण्यासाठी प्रवाशांना तिकीट काढण्याकरिता सुमारे ३०० मीटर अंतर चालावे लागते. त्यातच फलाटांवरील दिशादर्शक फलकांचा अभाव, भुयारी मार्गातील गैरसोय आणि स्थानकाच्या दुसऱ्या बाजूला बस व रिक्षांची अपुरी व्यवस्था यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि सामानासह प्रवास करणाऱ्या पर्यटकांना या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

कोकण रेल्वे आणि मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गाला जोडणाऱ्या या महत्त्वाच्या स्थानकातील असुविधांकडे रेल्वे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे लक्ष कधी जाणार, असा प्रश्न प्रवाशांकडून उपस्थित होत आहे.

रेल्वे स्थानक हे कोकणातून मुंबईकडे येणाऱ्या आणि मुंबईतून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी महत्त्वाचे केंद्र आहे. कोकण रेल्वेच्या पाच, सहा आणि सात क्रमांकाच्या फलाटांवर गाड्यांमधून उतरल्यानंतर मुंबईकडे जाणारी लोकल पकडण्यासाठी एक, दोन आणि तीन क्रमांकाच्या फलाटांवर जावे लागते. मात्र, लोकलचे तिकीट काढण्यासाठी मुख्य प्रवेशद्वाराजवळील तिकीट खिडकीपर्यंत जावे लागत असल्याने प्रवाशांना अतिरिक्त पायपीट करावी लागते. संबंधित भुयारी मार्गात तिकीट खिडकी किंवा स्वयंचलित तिकीट यंत्र बसविल्यास प्रवाशांचा वेळ आणि श्रम वाचू शकतात.

स्थानकातील फलाटांदरम्यान जाण्यासाठी भुयारी मार्गाची सुविधा असली, तरी दिशादर्शक फलक आणि माहितीफलक पुरेशा प्रमाणात नसल्याने प्रवाशांचा गोंधळ उडतो. विशेषतः प्रथमच पनवेल स्थानकावर येणाऱ्या पर्यटकांना योग्य फलाट शोधताना अडचणी येतात. पाच, सहा आणि सात क्रमांकाच्या फलाटांवरून हार्बर मार्गावरील फलाटांवर जाण्यासाठी भुयारी मार्ग अधिक सुलभ आणि स्पष्ट दिशादर्शक व्यवस्थेसह विकसित करण्याची गरज आहे. स्थानकाच्या बसस्थानकाकडील बाजूला रिक्षा आणि बसची सुविधा उपलब्ध आहे. मात्र, दुसऱ्या बाजूने बाहेर पडणाऱ्या प्रवाशांना सार्वजनिक वाहतुकीसाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने लांब अंतर चालत जावे लागते. सामानाच्या बॅगा घेऊन प्रवास करणाऱ्या कोकणातील प्रवाशांना याचा विशेष त्रास सहन करावा लागतो. स्थानकाच्या दोन्ही बाजूंना रिक्षा आणि बसची सुविधा उपलब्ध करून दिल्यास प्रवाशांची गैरसोय कमी होऊ शकते. कोकणातील रेल्वे स्थानकांवरील सुविधांसाठी पाठपुरावा करणाऱ्या लोकप्रतिनिधींनी पनवेल स्थानकातील समस्यांकडेही लक्ष द्यावे, अशी अपेक्षा प्रवाशांनी व्यक्त केली आहे.

अलिबागच्या सौंदर्यात नवी भर



- श्रीबाग-म्हाडा आयलँडचे प्रशांत नाईक यांच्या हस्ते लोकार्पण
- नागरिक, नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित

| अलिबाग | प्रतिनिधी |

शहराच्या सौंदर्यात भर घालण्याबरोबरच नागरिकांना आकर्षक आणि सुशोभित परिसर उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने श्रीबाग-म्हाडा आयलँडच्या मुख्य प्रवेशद्वाराचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. या सुशोभीकरणाच्या कामाचा उद्घाटन समारंभ माजी नगराध्यक्ष तथा वीज व बांधकाम समितीचे सभापती प्रशांत नाईक यांच्या हस्ते उत्साहात पार पडला.

अलिबाग शहराच्या विकासात केवळ मोठ्या पायाभूत प्रकल्पांनाच नव्हे, तर शहराचे सौंदर्य, स्वच्छता आणि नागरिकांना अनुभवता येणाऱ्या सार्वजनिक सुविधांनाही महत्त्व आहे. याच दृष्टिकोनातून श्रीबाग-म्हाडा आयलँडच्या मुख्य प्रवेशद्वाराचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. आकर्षक सजावटीमुळे या परिसराच्या सौंदर्यात भर पडली असून, शहराच्या दर्शनी भागाला नवे रूप प्राप्त झाले आहे.

अलिबाग हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे शहर असून, शहरात येणाऱ्या पर्यटकांसाठीही अशा सुशोभित आणि देखण्या परिसरातून शहराची सकारात्मक ओळख निर्माण होण्यास मदत होते. शहराच्या विकासासोबतच परिसराचे सौंदर्य जपणे आणि नागरिकांना अधिक चांगला परिसर उपलब्ध करून देणे हीदेखील विकासाची महत्त्वाची बाजू असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले. यावेळी नगरसेवक प्रदीप नाईक, सभापती अनिल चोपडा, संदीप पालकर, श्वेता पालकर, महेश शिंदे यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते. श्रीबाग-म्हाडा आयलँडच्या सुशोभीकरणामुळे परिसराच्या सौंदर्यात झालेली भर नागरिकांसाठी आनंददायी ठरणार आहे.

निवडक



रोहा स्टॅण्डवर प्रवाशांची गर्दी

खांब : दिवाळी सणासाठी मुंबई-ठाणे-पुणे तसेच अन्य मोठ्या शहरात कामधंद्याला असलेले नागरिक आपापल्या गावाला येऊन सण साजरा करून कुटुंबासमवेत आनंद लुटतात. पाच दिवसांचा हा सण संपल्यानंतर प्रत्येकाला पुन्हा आपापल्या कामधंद्याला जाण्याची ओढ लागते. काहीच्या शाळांच्या सुट्ट्याही रविवारपासून संपत असल्याने जो तो आपापल्या परतीच्या प्रवासाला निघाला असल्याने एसटी स्टॅण्डमध्ये तसेच परिसरात वाढत्या गर्दीमुळे गजबजून गेले आहे. दिवाळी सणाच्या समाप्तीनंतर पर्यटनासाठी काही जणांचा बेत आखलेला असल्याने पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळेही एसटी स्टॅण्ड गर्दीमुळे गजबजून गेले आहे. तसेच महामंडळाच्या गाड्या काहीवेळा वाहतूक कोंडी व अन्य कारणांमुळे वेळेवर येत नसल्यानेही प्रवासी वर्गाला गाड्यांची वाट पाहत थांबावे लागत असल्याने त्यांचे रुपांतर मोठ्या गर्दीत होत आहे.

रोडपालीतून ५० वर्षीय व्यक्ती बेपत्ता

पनवेल : रोडपाली येथून ५० वर्षीय मंगेश शांताराम तायडे बेपत्ता झाल्याप्रकरणी कळंबोळी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश तायडे हे रोडपाली गावातील संदीप पगडे यांच्या मंगल सदन चाळ येथून बेपत्ता झाले. याबाबत रिना मंगेश तायडे यांनी कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तायडे यांची उंची पाच फूट पाच इंच असून, बांधा सडपातळ, रंग सावळा आणि चेहरा उभट आहे. त्यांचे केस पांढरे असून व्यवस्थित कापलेले आहेत. डाव्या हातावर बदामाच्या आकाराचे चिन्ह असून त्यामध्ये इंग्रजी अक्षरे गोंदलेली आहेत. तायडे यांच्याबाबत कोणाला माहिती मिळाल्यास कळंबोली पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस अधिकारी बाबासाहेब शिरसाठ करीत आहेत.

क्रिकेटच्या वादातून तरुणाला मारहाण

खालापूर : गावातील क्रिकेट मैदानावर क्रिकेट कोण खेळणार, या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. यावेळी पाच जणांनी फिर्यादी आणि त्यांच्या चुलत भावाला शिवीगाळ व मारहाण केली. यातील एका आरोपीने फिर्यादीच्या डोक्यावर दगडाने वार करून जखमी केले. १४ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री १२.४५ वाजण्याच्या सुमारास खालापूर तालुक्यातील माडप गावच्या हद्दीतील सर्कल परिसरात ही घटना घडली. आरोपी क्रमांक १ ते ५ यांनी बेकायदेशीर जमाव जमवून गावातील क्रिकेट मैदानात क्रिकेट खेळण्यावरून फिर्यादीच्या चुलत भावाशी वाद घातला. त्याला शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. याबाबत फिर्यादीने आरोपींकडे जाब विचारला असता त्यांनी फिर्यादीलाही शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली आणि हाताने मारहाण केली. यावेळी आरोपी क्रमांक एक याने जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने दगडाने फिर्यादीच्या डोक्यावर वार करून जखमी केले. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे करीत आहेत.

कुरुळ तलावाचे पर्यटकांना आकर्षण



खारेपाट : अलिबाग तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत कुरूळ हद्दीतील कमळाच्या फुलाने विखुरलेले भव्य तलाव जिल्ह्यात आकर्षण ठरत आहे असे मत रायगड जिल्हा माजी सरकारी वकील ॲड. प्रसाद पाटील यांनी व्यक्त केले. विशेष म्हणजे मुरुड, रेवदंडा, आक्षी, नागाव, कशिद अशा विविध पर्यटनस्थळी जाणारे पर्यटक या तलावास आवर्जून भेट देत आहेत. गेली अनेक वर्ष कमळाचे तलावाची चांगल्या प्रकारे जपणूक केली आहे. तलावा शेजारी शंकराचे तसेच हनुमानाचे मंदिर असून त्यात विविध धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे.

पोलिसाला कारच्या बोनेटवरून फरफटत नेणारे गजाआड

एकाला जळगावातून, तर दुसऱ्याला अहिल्यानगरमधून अटक

| पनवेल | प्रतिनिधी |

नाकाबंदीदरम्यान कार थांबविण्याचा इशारा देणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याला कारच्या बोनेटवरून सुमारे २०० मीटरपर्यंत फरफटत नेल्याच्या गंभीर घटनेतील दोन्ही आरोपींना नवी मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. सोहम कुमावत (२२) आणि सोजल तायडे (२३) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी एकाला जळगावातून, तर दुसऱ्याला अहिल्यानगरमधून ताब्यात घेतले.

कळंबोलीतील रोडपाली परिसरातील डी-मार्ट चौकात रात्रीच्या वेळी पोलिसांकडून वाहनांची तपासणी सुरू होती. यावेळी पोलिसांनी पांढऱ्या रंगाच्या मारुती स्विफ्ट कारला थांबण्याचा इशारा केला. मात्र, चालकाने कार थांबविण्याऐवजी वेगाने पुढे नेली. यावेळी कर्तव्यावर असलेले पोलीस शिपाई दिलीप भोई (४३) यांना कारची धडक बसली. ते कारच्या बोनेटवर पडले असतानाही चालकाने वाहन न थांबवता त्यांना फरफटत नेले.

सुमारे २०० मीटर अंतर गेल्यानंतर चालकाने अचानक ब्रेक दाबल्याने भोई रस्त्यावर फेकले गेले. या घटनेत त्यांच्या उजव्या पायाच्या टाचेला फ्रॅक्चर झाले असून, इतर दुखापतीही झाल्या आहेत. घटनेनंतर कारमधील दोन्ही तरुणांनी घटनास्थळावरून पळ काढला होता.

पोलिसांनी तांत्रिक तपास आणि उपलब्ध माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढत त्यांना वेगवेगळ्या जिल्ह्यांतून अटक केली. संबंधित कारवर बनावट क्रमांकपट्टी लावण्यात आल्याची माहितीही समोर आली आहे. पोलीस कर्मचाऱ्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यास झालेल्या विलंबाची गंभीर दखल नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी घेतली. याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे.

नाकाबंदीत पोलिसांवरच वाहन घालण्याच्या या प्रकारामुळे कळंबोली परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



● रोहा तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे नेते ॲड. मनोज शिंदे यांची शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी सदिच्छा भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांच्या समवेत शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

कोलाड बाजारपेठेत धुळीचे साम्राज्य

वाहनचालकांसहित प्रवाशी त्रस्त

| कोलाड | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील कोलाड बाजारपेठेतील सर्व्हिस रोड वरील समस्या सुटता सुटेना. या बाजारपेठेत मोठया प्रमाणात धुळीचे साम्राज्य पसरले असुन ही धूळ आजूबाजूला उडत असल्यामुळे वाहन चालक, व्यापारी, पादचारी नागरिक या धुळीमुळे त्रस्त झाले असुन यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. यामुळे या बाजारपेठेतील अंतर्गत रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करावे अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

पावसाळ्यात खड्डे भरण्यासाठी वापरण्यात आलेली बारीक कचीचे मोठया प्रमाणात धुळीत रूपांतर झाले आहे. ही धूळ आजूबाजूच्या दुकानात उडत आहे. यामुळे दुकानदारांचे मोठे नुकसान होत आहे. याशिवाय ही धूळ ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या नाकातोंडात जात आहे. यामुळे येथील नागरिकांना सर्दी, खोकला, व श्वसनाचा त्रास होतांना होत आहे.

महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेली १८ वर्षांपासून सुरु असुन वर्षातून फक्त ४ किलोमीटर रस्ता तयार केला असता तरी फळस्पे ते इंदापूर दरम्यानचा रस्ता पूर्ण झाला असता. परंतु नियोजन शुन्य असल्यामुळे रस्ता अद्याप पूर्ण होऊ शकला नाही.

आता पावसाला संपून हिवाळा सुरु झाला आहे. या अंतर्गत रस्त्याचे काम करणे सोयीस्कर झाले आहे. अद्याप ही कोलाड बाजारपेठेतील अंतर्गत रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरु झाले नाही. यामुळे महामार्गांवरील कोलाड सर्व्हिस रोडवर पसरलेली खडी व उडत असलेली धूळीचा कायम स्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी संबंधित विभागाने त्वरित लक्ष देऊन सर्व्हिस रोड सिमेंट काँक्रेटन किंवा डांबरीकरण करून कोलाड नागरिकांची समस्या दूर करावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



शासनाचा पैसा वाया

लोकनेत्यांकडून फक्त तारीख पे दिली जात आहे. यामुळे शासनाच्या तिजोरीतील करोडो रुपये वाया गेले आहेत. याला जबाबदार कोण? अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाई

| अलिबाग | प्रतिनिधी |

वाहतुकीचे नियम धाब्यावर बसविणाऱ्या वाहनचालकांविरोधात जिल्हा पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. १४ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या एकूण २८६ जणांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईतून २ लाख २१ हजार ९०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. जिल्ह्यात वाहतुकीला शिस्त लागावी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांना आळा बसावा, यासाठी वाहतूक शाखेतर्फे ही कारवाई करण्यात आली.

सारडे येथे कोमसापचे बहारदार कविसंमेलन

कवींच्या कवितांनी सारडे गावात रंगली साहित्याची मैफल

| उरण | प्रतिनिधी |

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या उरण शाखेतर्फे उरण तालुक्यातील सारडे येथे बहारदार कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. विविध कवींच्या कविता, शाहिरी आणि आगरी बोलीतील सादरीकरणामुळे या साहित्यिक मैफलीत रंगत आली. भेंडखळ गावच्या संगीता भगत यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

यावेळी प्रा. एल.बी. पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, के.एस. पाटील, सुनंदा पाटील आदी प्रमुख अतिथी



म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविकात गंधार पाटील यांनी केले. आजच्या समाजातील महिषासुर अधिक घातक असल्याचे सांगत त्यांनी कार्यक्रमाचे आयोजक सारडे येथील पाटील कुटुंबियांचे अभिनंदन केले.

म.का. म्हात्रे यांच्या सुरेख सूत्रसंचालनाखाली कविसंमेलन रंगले. बालकवी अनुज शिवकर, अभ्यासू कवी केशव म्हात्रे, शाहीर अनंत पाटील, अजय शिवकर, मच्छिंद्र म्हात्रे, प्रा. एल. बी. पाटील यांनी आपल्या कविता सादर केल्या. विशेषतः आगरी बोलीतील कवितांनी उपस्थितांची दाद मिळवली आणि वातावरण हलके-फुलके केले.

जे. एस. पाटील, एम. एस. पाटील, सुनील पाटील, हरिश्चंद्र पाटील आणि पाटील कुटुंबियांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले होते. सुनील केशव यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी अनेक मान्यवर तसेच नागरिकांनी कवितांचा अस्वाद घेतला.

दिवेआगरमध्ये अमली पदार्थ जप्त

श्रीवर्धन : विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीररीत्या अमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्या व्यक्तीला दिघी सागरी पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून १७ हजार रुपये किमतीचा ३४ ग्रॅम वजनाचा अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. ही घटना १४ नोव्हेंबर रोजी पहाटे २.२५ वाजण्याच्या सुमारास दिवेआगर येथील मोहल्ला परिसरात घडली. त्यानुसार दिघी (सागरी) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी करीत आहेत.

साफसफाई करण्याची ग्रामस्थांची मागणी | पाण्याचा दैनंदिन वापरासाठी उपयोग

कौंडाल तलावाचा श्वास गुदमरला

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठणे केएमजी विभागातील मराठाआळी येथे जुन्या काळापासून अस्तित्वात असलेला कौंडाल तलाव गाळ, माती, झाडा झुडप्याने भरलेला असून जन जनवरांचे अस्तित्व असलेल्या या तळ्याचा श्वास गुदरमरलेला असून लवकरच तलावाची साफ सफाई करावी अशी अर्त मागणी ग्रामस्थ मंडळ मराठाआळी ने नागोठणे ग्रामपंचायतीकडे केली आहे.

नागोठणे मराठाआळी येथे इतिहासाची परंपरा सांगत असलेल्या काळापासून साधारण दोन ते तीन एकरात पसरलेल्या या तलावात पूर्वे-कडील डोंगरातून पावसाचे पाणी जमा होते. पावसाळ्यात तलाव पूर्ण भरल्यावर तलावाचे



पाणी नाल्याव्दारे वाहत जात अंबा नदीला मिळते. पूर्वीच्या काळात माणसांसाठी, जनावरांसाठी तसेच इतर कामासाठी विहिर, तलाव हे पाण्याचे स्रोत म्हणून कार्यरत होते. कौंडाल तळ्यातील पाण्याचा वापर केएमजी विभागातील ग्रामस्थ आपल्या दैनंदिन वापरासाठी करीत होते. पण अलिकडच्या काळात हा तलाव माती, शेवाळ, झाडा, झुडपाने, प्रदुषणाने व्यापलेला आहे तसेच या तळ्यात जन जनावरांचे अस्तित्व असल्याने तळ्याच्याकडेला राहणाऱ्या नागरिकांना याचा त्रास होऊ लागलेला आहे.

जलचरांच्या वास्तव्यात वाढ

तळ्यात माती, शेवाळ, झाडे, झुडपे वाढलेली दिसत असून त्यात जलचरांचे वास्तव्य मोठ्या प्रमाणावर वाढलेले दिसत आहे. त्याचा त्रास व भिती ग्रामस्थांना होताना दिसत आहे.

मराठाआळीतील ग्रामस्थांनी नागोठणे ग्रामपंचायतीकडे या तलावाची साफसफाई करण्यासाठी अर्ज केलेला होता. महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या वतीने तलावाचे प्रदुषण रोखणे,पाणी शुध्दीकरण आणि सुशोभीकरणासाठी विशेष निधी दिला जातो.

सन २०२०-२१ या वर्षात या तलावाच्या संपूर्ण सुशोभीकरणाचे काम चालू होते. परंतु आजमितीस या तलावाच्या सुशोभीकरणाचे काम पूर्ण झालेले नसून काही प्रमाणात झालेले काम ही निकृष्ट दर्जाचे आहे असा येथील ग्रामस्थांचा आरोप आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी असल्याने राज्यभर दुष्काळाची परीस्थिती ओढवलेली आहे. जनावरांना चारा, पाणी यासारख्या समस्या दुष्काळ काळात निर्माण होणार आहेत. गाळाने भरलेली तलावे शासनाने शुध्द केली तर अशा तलावांचे पाण्याचा वापर होणार आहे.

सरकारचे मालक अदानी?

देशात राज्य मोदींचे, फडणवीसांचे आहे की अदानीचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. अर्थात हा प्रश्न आजच निर्माण झालेला नाही. आणि त्याचे उत्तरही सर्वांना ठाऊक आहे. सरकार मोदींचेच आहे. पण ते अदानींसाठी, अदानींच्या इच्छेनुसार किंवा अदानींच्या सोईनुसार चालवले जात आहे. महाराष्ट्रातील अलिकडच्या दोन घटनांवरून त्याचा पुन्हा एकवार प्रत्यय आला आहे इतकेच. पहिले प्रकरण सातारा जिल्ह्यातील आहे. कर्जत आणि भीमाशंकरमध्ये टोरेंट कंपनीच्या पंप स्टोरेज प्रकल्पासाठी हजारो झाडे तोडण्यात आली. त्यामुळे देशभर गदारोळ झाला. पण हा असा एकच पंप स्टोरेज प्रकल्प नाही. सह्याद्रीच्या आजूबाजूला मुंबईपासून सिंधुदुर्गापर्यंत किमान तीस ते पन्नास असे प्रकल्प प्रस्तावित आहेत. त्यातलाच अदानी कंपनीचा एक प्रकल्प सातारा जिल्ह्यातील तारळी खोऱ्यात आहे. सह्याद्रीच्या खाली पाणी साठवायचे आणि नंतर ते गरजेनुसार वर नेऊन त्यातून जलविद्युत निर्माण करायची असा हा १५०० मेगावॉटचा प्रकल्प आहे. त्याचा खर्च सुमारे ५६७५ कोटी रुपये आहे. हा प्रकल्प कोयना अभयारण्याच्या परिसरात येतो. सह्याद्रीचे अत्यंत नाजूक असे पर्यावरणीय क्शेत्र किंवा इकॉलॉजिकली सेन्सिटिव्ह झोन इथे आहे. त्यामुळे अशा प्रकल्पांसाठी केंद्रीय हरित लवाद तसे वन खाते इत्यादींची परवानगी लागते. अदानी कंपनीने फेब्रुवारी २०२५ मध्ये जेव्हा केंद्राकडे परवानगीसाठी अर्ज केला त्यात ही किंमत ५६७५ कोटी रुपयेच दाखवली होती. पर्यावरणाला तसेच वन्यजीवांना उपद्रव करण्याची शक्यता असल्याने अशा प्रकल्पांकडून एकूण खर्चाच्या चार टक्के भरपाई वसूल करावी असा नियम आहे. त्यानुसार सह्याद्री व्याघ्र संवर्धन प्रकल्पासाठी २२७ कोटी रुपये भरावेत असा आदेश सरकारने अदानीला दिला. पण एरवी लाखो कोटी रुपयांमध्ये खेळणाऱ्या अदानीला हे २२७ कोटी रुपये भरणे बहुदा जड वाटू लागले. त्यासाठी मग त्याने यंदाच्या सप्टेंबरमध्ये एक नवीन प्रतिज्ञापत्र दाखल केले. त्यात या प्रकल्पाचा खर्च ५६७५ कोटी नव्हे तर केवळ ५६ कोटी रुपये आहे असे सांगण्यात आले.

२२५ कोटी रुपये माफ

सामान्य माणसाला एरवी साधा सातबारा मिळवायला एक आठवडा लागतो. पण इथे मूळ खर्चाला शंभराने भागून अदानीने प्रकल्प अवघ्या ५६ कोटी रुपयांचा आहे हे दाखवले आणि राज्य सरकारच्या वन खात्याच्या अधिकाऱ्यांनी अवघ्या तीन दिवसात ते मान्य केले. नवीन खर्चाच्या चार टक्के म्हणजे २.२७ कोटी रुपये अदानींनी भरावेत असा उदार निर्णय त्यांनी घेतला. म्हणजे अदानीचे तब्बल २२५ कोटी रुपये एका फटक्यात वाचले. या कागदावरच्या सहीची किंमत २२५ कोटी रुपये झाली. त्यातून कोणाच्या पदरात किती पडले याचा हिशेब ज्याने त्याने आपल्या मनाशी मांडावा. कर्जतचा टोरेंटचा प्रकल्प तीन हजार मेगावॉट क्षमतेचा आहे. त्याचा खर्च सुमारे १३ हजार कोटी आहे. अदानीचा प्रकल्प दीड हजार म्हणजे निम्म्या क्षमतेचा आहे. त्यामुळे त्याचा खर्च किमान सहा हजार कोटी रुपये असणे अपेक्षित आहे. कागदोपत्री सुरुवातीला तो तसा दिसलाही होता. पण नंतर अचानक जादूची कांडी फिरवून तो ५६ कोटी रुपयांवर आणला गेला. महाराष्ट्राच्या जनतेचे नशीब थोर की, हा प्रकल्प करण्यासाठी अदानींनाच उचलून १००० कोटी रुपये द्यावेत असा एखादा प्रस्ताव फडणवीस सरकारकडून आला नाही. असो. तर राज्य सरकारने अदानीचे २२५ कोटी रुपये माफ करण्याचे किंवा अदानीने २२५ कोटी रुपयांची चोरी करण्याचे उघड झाल्यावर साताऱ्याचे मानद वनसंरक्षक रोहन भाटे यांनी केंद्र व राज्य सरकारकडे याची तक्रार केली. हा उघडपणे एखाद्या भ्रष्टाचारासारखा प्रकार दिसत असल्याने सरकारला बहुदा नाईलाजाने चौकशीचे आदेश द्यावे लागले. त्या चौकशीतून काही निष्पन्न होईल याची खात्री नाही. कारण अदानीने या प्रकरणावर सफाई पेश केली आहे. त्यात हा प्रकल्प ५६७५ कोटी रुपयांचाच आहे आणि त्यातील जमीन व प्राथमिक साधनांची किंमत ५६ कोटी रुपये आहे असे म्हटले आहे. मात्र हा प्रकल्प खासगी जमिनीवर आकाराला येत असून त्यात वन खात्याच्या जमिनीचा संबंध नाही आणि हा प्रकल्प अभयारण्याच्या क्षेत्रातील नाही असे दोन खुलासे केले आहेत.

न पटणारे खुलासे

अदानीच्या खुलाशांमध्ये दोन गडबडी आहेत. एक म्हणजे तारळी खोऱ्यातील ही जमीन कदाचित थेटपणे वनक्षेत्रात येत असली वा नसली तरी ती सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाला लागूनच आहे. दुसरे म्हणजे कोयना अभयारण्याच्या या प्रकल्पाचे क्षेत्र निश्चित करणारी अधिकृत अधिसूचना अजून निघालेली नाही. मात्र हा प्रकल्प घोषित झालेला आहे व त्यावर कामही सुरू झाले आहे. जेव्हा अशी परिस्थिती असते तेव्हा अधिसूचना जाहीर होईपर्यंत या क्षेत्रालगतच्या परिसरालाही संभाव्य राखीव क्षेत्र मानावे असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. त्यानुसार अदानीला या अटीतून मोकळीक मिळू शकत नाही. दुसरे व सर्वात महत्वाचे म्हणजे अदानी आता या प्रकल्पाची किंमत ५६७५ कोटी रुपये असल्याचे सांगत असला तरी त्यानेच सप्टेंबर महिन्यात जे प्रतिज्ञापत्र सादर केले त्यात हीच किंमत वा हाच खर्च केवळ ५६ कोटी रुपये असल्याचे म्हटले होते. विशेष म्हणजे सरकारनेही ते मान्य केले व अदानीने द्यायची भरपाई खाली आणली. जर प्रकल्प खर्च जास्त होता तर अदानीने सप्टेंबरमधील प्रतिज्ञापत्र का दिले हा कळीचा प्रश्न आहे. आता हे प्रकरण न्यायालयात नेऊन या प्रकरणात नेमका कोण खोटेपणा करीत आहे व यात पाणी कोठे मुरते आहे ते उघड व्हायला हवे. जर यात अदानी दोषी ठरला तर त्याला फसवणूक केल्याबद्दल काळ्या यादीत टाकून वीज क्षेत्रातील सर्व प्रकल्प त्याच्याकडून काढून घ्यायला हवेत. अर्थातच हे केवळ स्वप्नरंजन आहे. कारण वर म्हटल्याप्रमाणे हे सरकार अदानीपुढे लाचार आहे व अदानीला शिक्षा करण्याची कोणतीही हिंमत ते दाखवू शकणार नाही. याच दरम्यान मुंबई विमानतळ बंद करून तेथील विमान उड्डाणे नवी मुंबईत हलवण्याचा प्रश्नही गाजतो आहे. हे दोन्ही विमानतळ अदानीकडे आहेत. सांताक्रूझची धावपट्टी दुरूस्तीसाठी बंद करायची असल्याने तेथील सेवा नवी मुंबईत हलवण्याचा फतवा अदानीने काढला. वास्तविक अदानी हा विमानतळाची देखभाल करणारा केवळ कंत्राटदार आहे. विमानसेवा हलवणे वगैरे त्याच्या अधिकारातील बाब नाही. त्याबाबत त्याने केंद्रीय हवाई वाहतूक मंत्रालयाला कळवायला हवे व तेच याबाबतचा निर्णय घेऊ शकतात. पण अदानीने एमिरेट्स, कुवेत वगैरे इतर देशांच्या व दुबई, कतार, दोहा इत्यादी ठिकाणी जाणाऱ्या विमानसेवा नवी मुंबईतून सुरू करा असा फतवा परस्पर जाहीर केला. इतकेच नाही तर या विमान कंपन्यांना हा निर्णय मंजूर नसेल तर त्यांना मुंबईतून उड्डाणे करायला मिळणार नाही असेही कळवून टाकले. हेही त्याच्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर होते. याबाबत बराच ओरडा झाल्यावर आता देवेंद्र फडणवीस यांनी यात लक्ष घातले असून कोणत्याही विमानसेवा मुंबईच्या बाहेर जाणार नाहीत असे म्हटले आहे. बहुदा आखाती देशांनी धमक्या दिल्यामुळे मोदी सरकारच्या आदेशावरून फडणवीसांनी हा पवित्रा घेतला असावा. पण अदानीच्या जागी समजा दुसरा उद्योगपती असता तर त्याचे कामच सरकारने काढून घेतले असते. इथे अदानीला नुसते रागावल्याचे नाटक केले जात आहे, हे नोंदण्यासारखे आहे.

विचार

‘सतेजपर्व’ आणि काँग्रेसजनांना उभारी

कोल्हापूरच्या ‘गोकुळ’ दूध संघाच्या निवडणुकीमध्ये सरत्या आठवड्यामध्ये भलतेच सत्तानाट्य घडले. या नाट्याची गुंज भाजप आणि महायुतीला धोबीपछाड देत काँग्रेसजनांना दुर्मिळ असा विजय मिळवून देणाऱ्या आमदार सतेज पाटील यांच्यामुळे ऐकायला मिळाली. त्यानंतर राष्ट्रीय वाहिन्यांनीही या घडामोडीची दखल घेतली. विजयाचा नवा पॅटर्न शोधणाऱ्या या निवडणुकीने राजकारणात विशेष तरंग उमटवले.



महेश जोशी

सरत्या आठवड्यातील एक घटना छोटेखानी असली तरी तिने समस्त काँग्रेसजनांना उभारी दिली. कोल्हापूरच्या ‘गोकुळ’ दूध संघाच्या निवडणुकीमध्ये सरत्या आठवड्यामध्ये भलतेच सत्तानाट्य घडले. या नाट्याची गुंज भाजप आणि युतीच्या मातब्बर सदस्यांना धोबीपछाड देत काँग्रेसजनांना दुर्मिळ असा विजय मिळवून देणाऱ्या आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांच्यामुळे ऐकायला मिळाली. त्यानंतर राष्ट्रीय वाहिन्यांनीही या घडामोडीची दखल घेतली. परिणामी, विजयाचा नवा पॅटर्न शोधणाऱ्या गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीने राजकारणात विशेष तरंग उमटवले. भाजपच्या नेतृत्वाखाली वावरणाऱ्या महायुतीच्या नेत्यांना या निवडणुकीमध्ये दारूण पराभव पत्करावा लागला. राज्यातील अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि श्रीमंत दूध संघावर कब्जा करण्यासाठी महायुतीने भलताच जोर लावला. एका बाजुला राज्यातील सत्ता आणि दुसऱ्या बाजुला सतेज पाटील अशी ही निवडणूक झाली. एका बाजुला मंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ, महादेव आणि धनंजय महाडिक, विनय कोरे, शिवाजी पाटील, के. पी. पाटील, चंद्रदीप नरके, राहुल पाटील, प्रकाश आवाडे असे दिग्गज नेते होते, तर दुसरीकडे, काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते, माजी मंत्री आणि दिवंगत शिक्षणमहर्षी डी. वाय. पाटील यांचे चिरंजीव आमदार सतेज पाटील हे जिद्दीने लढले. वास्तवात ‘कोण हे बंटी पाटील, त्यांच्या पॅनलचा एक तरी सदस्य निवडून येणार आहे का, आमच्याकडे ९० टक्के मतदार आहेत, अशी दर्पोक्ती राज्याचे काही मंत्री करीत होते. पंचवीस जागांसाठी गोकूळ दूध संघाची निवडणूक झाली. त्यात सतेज पाटील यांच्या समविचारी गटाचे तेराजण निवडून आले तर शेतकरी विकास आघाडी अर्थात महायुतीचे बाराजण विजयी झाले. यामुळे या संघात सतेज पाटील यांची सरशी झाली.

शेतकरी विकास आघाडीच्या तिघांनी फेरमतमोजणी मागितली. मतमोजणीत ९८ मते बाद ठरवली नसती तर २५ पैकी २० जागी आमच्या पॅनलचे उमेदवार नक्की निवडून आले असते, असे सतेज पाटील यांनीच निकालानंतर म्हटले. त्यांनी या निवडणुकीमध्ये शक्तिमान महायुतीला धक्का देऊन सर्वांना आश्चर्यचकीत केले. कोल्हापूरच्या गोकुळचा निकाल हा केवळ सहकार क्षेत्रापुरता किंवा दूध संघापुरता मर्यादीत नाही. निकाल म्हणजे दूध उत्पादक शेतकरी मतदारांची मानसिकता आहे का ? ‘गोकुळ’वर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी सतेज पाटील आणि हसन मुश्रीफ यांनी सर्व काही पणाला लावले. गेली अनेक वर्षे गोकूळ दूध संघावर महाडिक गटाचे वर्चस्व होते. ते आता सतेज पाटलांनी मोडून काढले आहे. नव्या संचालक मंडळामध्ये सतेज पाटील यांचे समर्थक असलेले तेराजण तर महायुतीला मानणारे बाराजण निवडून आले आहेत. नजिकच्या भविष्यात ते आपापल्या पॅनेलमधे कायम राहतील का, हा लाख मोलाचा प्रश्न आहे. सत्ता, पैसा आणि आमिषाने अगोदरच सहकार क्षेत्र बदनाम झाले आहे, तेरा-बारा अशा मताधिक्याने उमेदवार जिंकल्यामुळे दोन्ही गटांना कायम सतर्क रहावे लागणार आहे. गोकुळच्या निवडणुकीत भाजपाच्या बड्या नेत्यांनी तसेच मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातले होते अशी हवा निर्माण झाली होती. सगळं काही ठरलं आहे, असे महायुतीचे नेते बिनधास्त बोलत होते. ‘गोकुळ’वर आपला कब्जा झालाच, अशा भ्रमात ते होते. प्रत्यक्षात मतमोजणी सुरू झाली तेव्हा सुरूवातीपासनच सतेज पाटलांची आघाडी सरस ठरू लागली. विजयी आणि पराभूत झालेल्या काही उमदेवारांमध्ये मतांचा फरकही किरकोळ होता. त्यामुळे महायुतीच्या तिघा उमेदवारांनी फेरमतमोजणीची मागणी केली. सतेज पाटील यांच्या आघाडीला १४ तर मुश्रीफ-महाडिक यांच्या आघाडीला ११ जागा हे चित्र अखेरीस १३ विरूध्द १२ असे झाले. त्यामुळे आज सतेज पाटलांकडे सर्वात जास्त विजयी उमेदवार असले तरी त्यातला एकही नजिकच्या काळात बिथरणार नाही, याची दक्षता बाळगावी लागणार आहे. राज्यात विधासभेत निवडून आलेल्या ठाकरेंच्या शिवसेनेचे आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची घाऊक तोडफोड कशी झाली ते तीन-चार वर्षापूर्वी महाराष्ट्राने बघितले आहे. त्यामुळे गोकुळ दूध संघात तसा प्रयोग करायला फार मेहनत घ्यावी लागणार नाही, अशी कुजबूज आतापासूनच सुरू झाली आहे. महायुती जिंकणारच, असा फाजिल आत्मविश्वास युतीच्या दिग्गजांना होता. पण सतेज पाटलांनी त्यांचा डाव उलटवला. गोकुळ दूध संघ आपला आहे आणि शेतकऱ्यांचा आधार आहे, ही भावना त्यांनी सभासदांमध्ये रूजवली. गोकूळ दूध संघ गुजरातच्या घशात घालण्याचा डाव असल्याच्या प्रचाराने शेतकरी सावध झाले. महानंद डेअरी चालवायला महाराष्ट्राबाहेर गेली, आता गोकुळ अमूलला देण्यात येईल, असे भीतीचे वातावरण निर्माण झाले. अमूलला कर्नाटकमध्ये विरोध झाला, नंदिनी दूध अमूलच्या घशात घातले गेले नाही. मग गोकुळ दूध संघ बाहेरच्या राज्याला का द्यायचा, या प्रश्नाने निवडणुकीचे वारे बदलले.

गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीमध्ये महायुतीचे नेते मंत्री हसन मुश्रीफ यांचे पुत्र आणि मावळते अध्यक्ष नावेद मुश्रीफ यांचा पराभव झाला. अरूण डोंगळे आणि विश्वास पाटील या गोकुळच्या आणखी दोन माजी अध्यक्षांना पराभव पत्करावा लागला. आमदार अमल महाडिक यांच्या पत्नी शौमिका यांचा सात मतांनी झालेला पराभव निवडणुकीत टर्निंग पॉइंट ठरला. निवडणुकीमध्ये मतदारांनी एकनिष्ठ राहावे यासाठी पाकिटाचे आमिष होतेच. एकेका मताची किमत तीस हजार रूपये होती, अशी उघड चर्चा निकालानंतर ऐकायला मिळाली. मतदारांना देव-देवतांच्या नावाने अंगारा व भंडारा देऊन शपथाही घातल्या गेल्या. यल्लमा, रेणुका, बाळुमामा हाल सिध्दनाथ यांच्या नावे शपथा घालण्यात आल्या. एवढे सारे होऊनही महायुतीला गोकुळ दूध संघावर कब्जा मिळवता आला नाही. संपूर्ण निकाल लागायच्या आधीच सतेज पाटलांच्या समर्थकांनी गुलाल उधळून जल्लोश सुरू केला. फटाक्याच्या माळा लावण्यात आल्या. सतेज पाटलांना खांद्यावर घेऊन त्यांच्या विजयाच्या घोषणो दिल्या गेल्या. गोकुळचा बाप, शेतकरी हाय, कैवारी बंटी पाटीलसाहेब, गोकुळ वाचवा असा जयघोष केला गेला. हसन मुश्रीफ यांनी निकालानंतर दूध उत्पादक शेतकऱ्यांनी दिलेला निकाल आम्ही स्वीकारत आहोत, असे म्हटले. महायुतीत शेवटपर्यंत सुरू असलेली वादावादी कदाचित सभासद मतदारांना आवडली नसावी, अशी प्रतिक्रीया यांनी दिली. गोकुळच्या निकालात महायुतीने रडीचा डाव खेळल्याची टीका शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी केली.

दुसऱ्या बाजुला सर्व साडेपाच हजार सभासदांच्या हितासाठी आपण काम करणार, असे सतेज पाटील यांनी म्हटले. मात्र गोकुळ मधील सत्ता टिकण्यासाठी त्यांना सतत तारेवरची कसरत करावी लागणार आहे. सतेज पाटील हे गोकुळमध्ये किंगमेकर ठरले आहेत. दूध उत्पादन क्षेत्रात गोकुळ या ब्रँडचा महाराष्ट्रात मोठा दबदबा आहे. १६ मार्च १९६३ रोजी स्थापन झालेल्या संघाने दूध संकलन, प्रक्रिया व विपणन क्षेत्रात घोडदौड कायम ठेवली आहे. २०२५ -२६ या वर्षात जवळपास साडेचार हजार कोटी रुपयांची उलाढाल आहे. या वर्षात संघाने ६६ कोटी लिटर दूध संकलन आणि प्रक्रिया हातळली आहे. गोकुळकडे सध्या १७ लाख लिटर प्रति दिवस क्षमतेचा आधुनिक डेअरी प्लँट आहे. नवी मुंबईतील पॅकिंग युनिटसह एकूण आठ लाख लिटर्स क्षमतेची चार शीतकरण केंद्रेआहेत. बीएमसी युनिटव्दारे ६१ ठिकाणी थेट दूध संकलन केले जाते.

चर्चा आजची

वाचाळवीरांनी स्वतःला आरशात पाहावे!



अरविंद शेलार

रायगड जिल्ह्याला राजकारणाची मोठी परंपरा आहे. या जिल्ह्याने महाराष्ट्राला अनेक दिग्गज, अभ्यासू, संयमी आणि सुसंस्कृत नेतृत्व दिले. राजकारणात मतभेद होते, वैचारिक संघर्ष होते, आरोप-प्रत्यारोपही होत होते; मात्र विरोधकांचा मान-सन्मान राखण्याची एक मर्यादा होती. वैचारिक विरोध म्हणजे व्यक्तिगत शत्रुत्व नव्हे, याचे भान रायगडच्या तत्कालीन राजकीय नेतृत्वाने कायम ठेवले. राजकारणात शब्दांचे वजन असते आणि लोकप्रतिनिधींच्या बोलण्याला एक जबाबदारी असते, याची जाणीव त्या पिढीला होती. मात्र, आज याच रायगडच्या राजकीय संस्कृतीला ग्रहण लागल्याचे चित्र दिसत आहे.

शिंदे गटातील रायगडच्या दोन आमदारांची अलीकडील वक्तव्ये आणि त्यांची विरोधी पक्षांवर टीका करण्याची पातळी पाहिली, तर रायगडच्या राजकीय परंपरेची नेमकी कोणत्या दिशेने वाटचाल सुरू आहे, असा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाही. सुसंस्कृत राजकारणाला लागलेला हा कलंक आहे, अशी टीका नागरिकांमधून होत असेल तर त्याला कारणीभूत कोण, याचा विचार या लोकप्रतिनिधींनी करायला हवा.

राजकारणात विरोधकांवर टीका करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. सरकारच्या धोरणांवर बोला, विकासकामांवर बोला, भ्रष्टाचाराचे आरोप असतील तर पुराव्यांसह मांडा, जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवा. पण, दुसऱ्याचे साम्राज्य उद्ध्वस्त करू, त्याला धडा शिकवू, अशी भाषा वापरून नेमके कोणते राजकारण साध्य करायचे आहे? टाळ्या आणि शिट्ट्या मिळविण्यासाठी व्यासपीठावरून काहीही बरळायचे आणि त्यालाच आपले कर्तृत्व समजायचे, ही राजकीय संस्कृती असू शकत नाही. म्हणूनच आज आपल्यावर लोक छी थू करीत आहेत, याची समज आपल्याला असू नये?

विशेष म्हणजे, कामापुरते सोयीस्कर मौन बाळगायचे आणि मनाविरुद्ध घडले की तुटून पडायचे, हा दुटप्पीपणा जनतेच्या लक्षात येत नाही, असे या वाचाळवीरांना वाटते काय? आपण सत्तेच्या सावलीत असल्याने दुसऱ्यांना नैतिकतेचे डोस पाजायचे, याला राजकीय प्रामाणिकपणा म्हणायचा का?

रायगडच्या राजकारणात यापूर्वीही अनेकदा टोकाचे मतभेद झाले. एकमेकांविरोधात निवडणुका लढल्या, सभांमधून परखड टीकाही झाली. मात्र, राजकीय विरोधकाला संपविण्याची भाषा करण्यापेक्षा जनतेच्या मनात स्थान निर्माण करण्यावर भर दिला जात होता. वैचारिक संघर्षातून नेतृत्व उभे राहात होते. आज मात्र विकासाचे मुद्दे बाजूलचा राहिले असून, दुसऱ्यावर आगपाखड करण्यातच यांचे दिवस भरत चालले आहेत. हीच खरी तर रायगडच्या राजकारणाची शोकांतिका म्हणावी लागेल.

लोकप्रतिनिधींचे काम जनतेचे प्रश्न सोडविणे आहे की एकमेकांवर शाब्दिक हल्ले चढविणे? रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण, बेरोजगारी, शेतकरी, प्रकल्पग्रस्त आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर किती वेळ दिला जातो आणि एकमेकांवर टीका करण्यात किती वेळ खर्च होतो, याचा हिशेब जनतेने मागितला तर त्याचे उत्तर काय देणार? जनतेने निवडून दिले ते जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी; एकमेकांची उणीदुणी काढण्यासाठी नव्हे!

दुसऱ्याकडे बोट दाखवताना आपल्या हाताची उरलेली चार बोटे स्वतःकडेच आहेत, याचे भान ठेवले पाहिजे. दुसऱ्याला आरसा दाखविण्यापूर्वी स्वतःचा चेहरा एकदा आरशात पाहण्याची गरज आहे. आपण किती सुसंस्कृत आहोत, आपल्या वक्तव्यांची पातळी किती आहे आणि आपण ज्या पदावर बसलो आहोत, त्या पदाची प्रतिष्ठा राखतो आहोत का, याचा आत्मपरीक्षणाचा क्षण या लोकप्रतिनिधींनी घ्यायला हवा.

रायगडची जनता सुज्ञ आहे. कोण काय बोलतो, याची नोंद जनता ठेवत असते. सत्तेचा उन्माद कायमस्वरूपी नसतो आणि राजकीय खुर्ची ही कोणाची खासगी मालमत्ता नाही. आज सत्तेत आहात म्हणून काहीही बरळणार का? आपल्याला लोकांनी दिलेल्या पदाचा मान राखता येत नसेल, तर त्या पदाची प्रतिष्ठा तरी कशाला मिरवता?

रायगडने संयमी, अभ्यासू आणि विचारांची लढाई लढणारे नेतृत्व पाहिले आहे. त्या परंपरेला आजच्या वाचाळ राजकारणाची जोड देण्यापेक्षा तिचा आदर्श घेण्याची गरज आहे. राजकारणात विरोधकांना नामोहरम करण्यापेक्षा जनतेचा विश्वास जिंकणे अधिक महत्त्वाचे असते. धमक्या, आव्हाने, व्यक्तिगत टीका आणि बेताल वक्तव्यांनी जनतेच्या मनात आदर निर्माण होत नाही, उलट राजकारणाविषयी तिरस्कार वाढतो. नव्या पिढीने तुमच्याकडून काय बोध घ्यायचा?

दुसऱ्याचे राजकीय अस्तित्व उद्ध्वस्त करण्याच्या वल्गना करण्यापेक्षा स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करा. शब्दांनी साम्राज्य उभे राहात नाही आणि आरडाओरड करून जनतेचा विश्वास संपादन करता येत नाही. रायगडला वाचाळवीर नकोत, तर विकासाची दृष्टी असणारे लोकप्रतिनिधी हवेत. त्यामुळे दुसऱ्याला आरसा दाखविण्याच्या फंदात पडण्यापूर्वी या वाचाळवीरांनी स्वतःला आरशात पाहावे. कारण, जनतेच्या न्यायालयात नाचण्याला, टाळ्या-शिट्ट्यांना नव्हे, तर कामाला किंमत असते, याचे भान आपण लोकप्रतिनिधी म्हणून जरुर ठेवाल, एवढीच अपेक्षा.

लोकसंसद

अंडर-१९ संघाचा पाकिस्तानवर रोमहर्षक विजय!

ओमानमधील अल अमेरात क्रिकेट मैदानावर पार पडलेल्या १३ व्या अंडर-१९ आशिया कप स्पर्धेच्या अंतिम सामन्यात कर्णधार लक्ष्य रायचंदानीच्या भारतीय युवा संघाने अविश्वसनीय कामगिरी करत पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा १ गडी राखून पराभव केला. शेवटच्या चेंडूवर चौकार ठोकून मोहित उल्वाने भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. या विजयासह भारताने नवव्यांदा अंडर-१९ आशिया कपचे विजेतेपद पटकावले आहे. भारताने यापूर्वी १९८९, २००३, २०१२, २०१४, २०१६, २०१८, २०१९ आणि २०२१ या वर्षांमध्ये आठवेळा अंडर-१९ आशिया कपचे विजेतेपद पटकावले होते. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या पाकिस्तानने निर्धारित ५० षटकांत नऊ गडी गमावून भारतासमोर ३३७ धावांचा डोंगर उभा केला होता. विजयासाठी ३३८ धावांच्या कठीण लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची अवस्था ८ बाद २५२ अशी बिकट झाली होती. मात्र, मानल चौहान (४७ धावा) आणि दहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या मोहित उल्वा (नाबाद ४९ धावा) यांनी झुंजार खेळी करत भारताला अविस्मरणीय विजय मिळवून दिला. अत्यंत दबावाच्या परिस्थितीतही भारतीय युवा खेळाडूंनी हार न मानता मिळवलेला हा अविस्मरणीय विजय भारतीय क्रिकेटचे भविष्य उज्ज्वल असल्याची पावती आहे. या युवा खेळाडूंचे आणि प्रशिक्षक ऋषिकेश कानिटकर यांचे हार्दिक अभिनंदन!

-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

मराठी रंगभूमीचा नटसम्राट डॉ. श्रीराम लागू!

मराठी रंगभूमीवर आपल्या अभिनयाचा अमीट ठसा उमटविणारे, आपल्या दमदार आवाजाने आणि कसदार अभिनयाने असंख्य रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांची आज, १६ नोव्हेंबर रोजी ९९ वी जयंती. १६ नोव्हेंबर १९२७ रोजी जन्मलेल्या डॉ. श्रीराम लागू यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. अभिनय, रंगभूमी, चित्रपट आणि सामाजिक विचारांच्या क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी आहे.

डॉ. श्रीराम बाळकृष्ण लागू यांचा जन्म सातारा येथे झाला. त्यांचे बालपण साताऱ्यात गेले. त्यांचे शालेय शिक्षण पुण्यातील भावे हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर फर्ग्युसन महाविद्यालय आणि बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातून त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. ते कान, नाक आणि घसा यांचे तज्ज्ञ शल्यचिकित्सक होते. वैद्यकीय व्यवसाय करत असतानाच त्यांच्यातील कलावंतही सतत जागा होता. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांना नाटकाची आवड होती. भालबा केळकर यांच्यासारख्या सहकाऱ्यांसोबत त्यांनी प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन या नाट्यसंस्थेच्या माध्यमातून नाट्यक्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली.

वैद्यकीय व्यवसाय आणि नाटक या दोन्ही आघाड्यांवर काम करताना त्यांनी अभिनयाची आवड जपली. मात्र, अभिनय हेच आपले जीवन असल्याची जाणीव झाल्यानंतर १९६९ मध्ये वयाच्या ४२ व्या वर्षी त्यांनी वैद्यकीय व्यवसायाला रामराम ठोकून पूर्णवेळ अभिनयक्षेत्रात प्रवेश केला. वसंत कानेटकर लिखित इथे ओशाळला मृत्यू या नाटकातून त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण केले.

हिमालयाची सावली, काचेचा चंद्र, उद्ध्वस्त धर्मशाळा, एकच प्याला, गार्बो अशा अनेक नाटकांमधून त्यांनी आपल्या अभिनयाची विविध रूपे प्रेक्षकांसमोर आणली. गंभीर, विनोदी, भावनिक आणि वैचारिक अशा विविध प्रकारच्या भूमिका त्यांनी तितक्याच ताकदीने साकारल्या.

चित्रपटसृष्टीतही त्यांनी आपल्या अभिनयाचा वेगळा ठसा उमटविला. व्ही. शांताराम दिग्दर्शित पिंजरा या चित्रपटाने त्यांना मराठी चित्रपटसृष्टीत विशेष लोकप्रियता मिळवून दिली. सामना, सिंहासन, मुक्ता यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. हिंदी चित्रपटसृष्टीतही त्यांनी काम केले. घरौंदा, लावारिस, मुकद्दर का सिकंदर, एक दिन अचानक यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या भूमिका उल्लेखनीय ठरल्या. रिचर्ड ॲटनबरो यांच्या गांधी या आंतरराष्ट्रीय चित्रपटात त्यांनी गोपाळ कृष्ण गोखले यांची भूमिका साकारली होती. मराठी आणि हिंदी चित्रपटांसह विविध भाषांतील चित्रपटांमध्ये त्यांनी आपल्या अभिनयाची छाप उमटवली.

डॉ. श्रीराम लागू हे केवळ अभिनेते नव्हते, तर ते विज्ञाननिष्ठ, बुद्धिप्रामाण्यवादी आणि पुरोगामी विचारांचे समर्थक होते. ते निरीश्वरवादी होते. देवाला रिटायर करा या त्यांच्या विधानाने एकेकाळी समाजात मोठी चर्चा आणि खळबळ उडाली होती. अंधश्रद्धा, कर्मकांड आणि समाजातील अनिष्ट रूढी-परंपरांवर त्यांनी परखड भाष्य केले. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीशीही त्यांचा जवळचा संबंध होता. नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांशी त्यांची वैचारिक जवळीक होती. कला ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे, अशी त्यांची धारणा होती. १७ डिसेंबर २०१९ रोजी पुणे येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील एका महान पर्वाचा अस्त झाला. मात्र, त्यांनी साकारलेल्या भूमिका, त्यांचे अजरामर संवाद आणि त्यांचे निर्भीड विचार आजही रसिकांच्या स्मरणात आहेत.

– श्याम ठाणेदार

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे
१६ नोव्हेंबर
१) श्रीम. शुभांगी कमलाकर किल्लेकर, अलिबाग
१६-११-१९४९

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

बिरसांचा गौरव की आदिवासींचा विनाश?

■ विनाशकारी लोहखाणी व प्रक्रिया प्रकल्प तातडीने रद्द करा

| गडचिरोली | प्रतिनिधी |

एका बाजूला क्रांतिकारी बिरसा मुंडांच्या विचारांचा गौरव करायचा आणि दुसऱ्या बाजूला त्याच आदिवासींचे जल, जंगल, जमीन आणि नैसर्गिक साधनसंपत्ती भांडवलदारांच्या घशात घालायची, हा शासनाचा नेमका कोणता गौरव? जनजातीय गौरव दिनाच्या आडून आदिवासींच्या अस्तित्वावरच घाला घालण्याचा सरकारचा डाव असल्याचा घणाघाती आरोप शेतकरी कामगार पक्षाने केला आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील हजारो हेक्टर जंगल आणि नैसर्गिक संसाधने उद्ध्वस्त करणाऱ्या प्रस्तावित तसेच मंजूर लोहखाणी व प्रक्रिया प्रकल्प तातडीने रद्द करून आदिवासींचा खऱ्या अर्थाने सन्मान करावा, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या आदिवासी, भटके-विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष भाई रामदास जराते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

■ शेतकरी कामगार पक्षाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

क्रांतिकारी बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त गडचिरोली येथे आयोजित जनजातीय गौरव दिनाच्या पार्श्वभूमीवर भाई रामदास जराते यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून सरकारच्या भूमि केवर जोरदार हल्ला चढविला आहे. आपल्या नेतृत्वाखालील भांडवलदारधार्जिण्या सरकारने गडचिरोली जिल्ह्यात लागू असलेल्या पाचव्या अनुसूचीची तमा न बाळगता पेसा आणि वनाधिकार कायद्यांची तसेच पारंपरिक ग्रामसभांना असलेल्या अधिकारांची वासलात लावली आहे. अतिअसुरक्षित आदिवासी भागात बळजबरीने आणि बेकायदेशीर पद्धतीने लोहखाणी प्रस्तावित करण्याचा सपाटा लावला असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

या लोहखाणी आणि प्रकल्पांमुळे येणाऱ्या काळात आदिवासींच्या प्रथा, परंपरा आणि संस्कृतीवर घाला पडणार आहे. निसर्गाची अपरिमित हानी होण्याबरोबरच पिण्याच्या पाण्याचे मोठे दुर्भिक्ष आणि आरोग्याचे गंभीर प्रश्न निर्माण होण्याची चिन्हे आहेत. विस्थापन आणि असहायतेची स्थिती निर्माण करून आदिवासींच्या अस्तित्वालाच बाधा आणणारी सरकारची भूमिका असेल, तर अशा परिस्थितीत जनजातीय गौरव दिन साजरा करून आदिवासींचा कोणता गौरव केला जात आहे, असा सवाल जराते यांनी उपस्थित केला आहे.

आश्रमशाळांतील चार आदिवासी मुलींचा बळी घेणाऱ्या प्रशासकीय व्यवस्थेला पाठीशी घालायचे, जिल्हा रुग्णालय आणि आरोग्य केंद्रे प्रभारींच्या भरोशावर ढकलायची आणि दुसरीकडे आदिवासींच्या गौरवाच्या बाता करायच्या, हा शासनाचा दुटप्पीपणा आहे. अशा गौरवाचा जिल्हावासीयांच्या वतीने तीव्र निषेध करीत असल्याचेही त्यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे.

बिरसा मुंडांचा गौरव केवळ जयंत्या साजऱ्या करून होणार नाही, तर त्यांच्या विचारांचा आदर्श कृतीत उतरवून होईल. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील प्रस्तावित आणि मंजूर सर्व विनाशकारी लोहखाणी व प्रक्रिया प्रकल्प तातडीने रद्द करावेत. आदिवासींचे जल, जंगल, जमीन आणि नैसर्गिक साधनसंपत्ती ओरबाळण्याचे धोरण थांबवून त्यांच्या संस्कृती, सभ्यता आणि अस्तित्वाचा सन्मान करावा, असे थेट आव्हान भाई रामदास जराते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.

माथेरानमध्ये रांगोळी, किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन

| माथेरान | प्रतिनिधी |

माथेरान नगरपरिषदेच्या सहकार्याने महिला बालकल्याण समितीच्या वतीने १६ व १७ नोव्हेंबर रोजी भव्य रांगोळी आणि किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. समिती सभापती ऐश्वर्या निखिल शिंदे यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांसह नागरिकांनाही सहभागी होता येणार आहे.

१६ नोव्हेंबर रोजी असेंब्ली हॉलच्या प्रांगणात सायंकाळी ४ ते ६ या वेळेत रांगोळी स्पर्धा होणार आहे. तर १७ नोव्हेंबर रोजी स्पर्धकांच्या घरी जाऊन किल्ल्यांचे परीक्षण केले जाणार आहे. किल्ले बांधणी स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना अनुक्रमे ५ हजार, ४ हजार आणि ३ हजार रुपये व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. तर रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांना अनुक्रमे २ हजार ५००, २ हजार आणि १ हजार ५०० रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

■ महिला बालकल्याण समितीचा उपक्रम

■ विजेत्यांना रोख पारितोषिके व सन्मानचिन्ह

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासह कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमासाठी सभापती ऐश्वर्या शिंदे यांच्यासह समितीचे सदस्य प्रयत्नशील आहेत.

आ. बालदी अकार्यक्षम, खा. बारणे स्वार्थी!

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, रखडलेली गावठाण वाढ, स्थानिक तरुणांचा रोजगार आणि वाहतूककोंडी या प्रश्नांवरून रायगडभूषण प्रा. एल. बी. पाटील यांनी भाजपचे आमदार महेश बालदी आणि शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. अकार्यक्षम आमदार आणि स्वार्थी खासदार यांच्या नाकर्तेपणामुळे उरण तालुका विकासापासून वंचित राहिल्याचा घणाघात त्यांनी केला आहे.

काही वर्षांपूर्वी मुख्यमंत्री तथा तत्कालीन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करून गावठाण विस्ताराला मंजुरी देण्याची मागणी केली होती. त्यावेळी अधिकाऱ्यांना सूचना देऊनही अद्याप शासन निर्णय (जीआर) निघालेला नाही. परिणामी,

■ प्रा. एल.बी. पाटील यांचा घणाघात





१२.५० टक्के जमिनीच्या वाटपातून प्रकल्पग्रस्तांच्या घरांची जागा कापली जात आहे. या प्रश्नावर आम दार आणि खासदारांनी शासनदरबारी पाठपुरावा करणे अपेक्षित होते; मात्र त्यांनी काहीही केलेले दिसत नाही, असे पाटील म्हणाले.

उरणमधील वाहतूक कोंडी, बेकायदेशीर पार्किंग आणि गुटख्याची सर्रास विक्री यामुळे नागरिक त्रस्त आहेत. हजारो कंपन्या असूनही स्थानिक तरुणांना रोजगारात डावलून बाहेरील उमेदवारांना संधी दिली जात आहे. जनतेचे प्रश्न सोडविण्याऐवजी पार्किंगची कंत्राटे आणि दादरपाडा परिसरातील जमिनींच्या व्यवहारांत काही जण अधिक रस घेत असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये असल्याचेही त्यांनी नमूद केले. नागरिकांनी आणि गावांनी या संघर्षाला सहकार्य करावे. सिडकोने ठरवलेली जमिनीची किंमत कमी करण्यासाठीही एकजुटीने प्रयत्न करावेत, असे आवाहन प्रा. एल.बी. पाटील यांनी केले.

लखमी गायकर यांचे निधन

| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील उडदवणे गावच्या रहिवासी असणाऱ्या लखमी झांजू गायकर यांचे ६ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७० वर्षांच्या होत्या.



त्यांच्या निधनाने समस्त गायकर परिवारासह उडदवणे गावावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींसह त्यांचे आप्तस्वकीय व मित्र परिवार यांनी त्यांच्या निवासस्थानी अंत्यदर्शन घेऊन त्यांच्या परिवाराचे सांत्वन केले. त्यांच्या पश्चात त्यांचे पती, तीन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे. लखमी गायकर यांचे दशक्रियाविधी व अंतिम धार्मिकविधी १७ नोव्हेंबर रोजी दोन्ही विधी राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

माजी सैनिकांसाठी आरोग्य केंद्राचा मार्ग मोकळा?

■ २५ हजार माजी सैनिक व कुटुंबियांना मिळणार दिलासा

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

पनवेल आणि परिसरातील माजी सैनिक, वीर नारी तसेच त्यांच्या कुटुंबीयांसाठी प्रस्तावित माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजना (ईसीएचएस) बहुविशेषोपचार केंद्राच्या स्थापनेला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यासाठी संरक्षण मंत्रालय आणि भारतीय तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करून प्रशासकीय प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.

२८ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीत पनवेल आणि अंबरनाथ येथे नवीन आरोग्य केंद्र सुरू करण्याच्या प्रस्तावांवर चर्चा झाली. यावेळी ईसीएचएस प्रादेशिक केंद्र, मुंबईच्या संचालकांनी पनवेल येथील भारतीय तटरक्षक दलाच्या परिसरात प्रस्तावित केंद्राच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच पुढील प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

पनवेलमध्ये हे केंद्र सुरू झाल्यास पनवेल, कामोठे, खारघर, कर्जत, खोपोली, पेण, अलिबाग आणि रायगड परिसरातील सुमारे २५ हजार माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना लाभ होणार आहे.

सध्या वैद्यकीय सुविधांसाठी माजी सैनिकांना लांबचा प्रवास करावा लागत असल्याने ज्येष्ठ नागरिक आणि आजारी माजी सैनिकांची गैरसोय होते. पनवेलमध्ये हे केंद्र सुरू झाल्यास त्यांना जवळच आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे प्रशासकीय प्रक्रिया लवकर पूर्ण करून हा प्रस्ताव प्रत्यक्षात आणावा, अशी अपेक्षा माजी सैनिक कल्याण संघटनेने व्यक्त केली आहे.

पुरस्कारांसाठी प्रस्ताव पाठवा!

| खरोशी | प्रतिनिधी |

समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी 'म हाराष्ट्र सुपरफास्ट न्यूज' चॅनेलच्या वर्धापन दिनानिमित्त २० डिसेंबर रोजी भव्य पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पुरस्कारांसाठी पात्र व्यक्तींची नामांकने व प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन चॅनेलचे मुख्य संपादक संजय खांबेटे यांनी केले आहे.

यामध्ये उत्कृष्ट पत्रकार, उत्कृष्ट कीर्तनकार, आदर्श सरपंच, आदर्श महिला उद्योजक, आदर्श पुरुष उद्योजक, आदर्श शेतकरी आणि आदर्श समाजसेवक आदी पुरस्कारांचा समावेश आहे. नागरिकांनी आपल्या गावातील, परिसरातील, तालुक्यातील तसेच जिल्ह्यातील गुणवंत व्यक्तींची नावे पुरस्कारासाठी सुचवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छुकांनी आपले प्रस्ताव २५ नोव्हेंबरपर्यंत पाठवावेत. अधिक माहितीसाठी मुख्य संपादक संजय खांबेटे ८६६८५००७६२, उपसंपादक धनराज गोपाळ ९४२३८२३१९७ यांच्याशी संपर्क साधावा.

आंजर्लेच्या समुद्रात जेलीफिशचा धोका

| दापोली | प्रतिनिधी |

दापोली तालुक्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या आंजर्ले समुद्रकिनाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर जेलीफिश आढळून आल्याने पर्यटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जेलीफिशच्या संपर्कामुळे अनेकांना त्वचेवर तीव्र ॲलर्जी, जळजळ आणि इतर त्रास होण्याची शक्यता असून, सकाळपासून अशा प्रकारच्या रुग्णांची संख्या वाढत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आंजर्ले समुद्रकिनाऱ्यावर पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या उत्साहावर जेलीफिशच्या धोक्यामुळे विरजण पडण्याची शक्यता आहे.

समुद्रात पोहण्यासाठी उतरणाऱ्या पर्यटकांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन स्थानिकांनी केले आहे. जेलीफिशच्या संपर्कात आल्यास त्यांच्या विषारी तंतूंमुळे त्वचेवर तीव्र प्रतिक्रिया उमटू शकते. काही प्रकरणांमध्ये गंभीर स्वरूपाचा त्रासही होऊ शकतो. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यावर जेलीफिश दिसल्यास त्यांना स्पर्श करू नये तसेच समुद्रात उतरणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आंजर्ले परिसरातील हॉटेल, रिसॉर्ट आणि होमस्टे व्यावसायिकांनी पर्यटकांना समुद्रातील जेलीफिशच्या धोक्याची स्पष्ट कल्पना द्यावी, अशा सूचना दिल्या आहेत.

लालपरीचा 'असुरक्षित' कारभार

| भंडारा | प्रतिनिधी |

'प्रवाशांच्या सेवेसाठी' आणि 'सुरक्षित प्रवास' असं ब्रीद मिरवणाऱ्या एसटी महामंडळाचा भोंगळ आणि संतापजनक कारभार भंडाऱ्यात समोर आला आहे. भंडारा ते मुंढरी मार्गावर धावणाऱ्या एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या दोन विद्यार्थिनींना चालक आणि वाहकानं रात्रीच्या अंधारात वाटेतचं रोहा गावात उतरवून दिल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या प्रकारामुळं मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

भंडारा येथून मुंढरी गावाकडं जाणारी बस क्रमांक एम.एच. ४० वाय ५००८ रात्रीच्या सुमारास रोहा गावात पोहोचली. मात्र, रोहा

■ रात्रीच्या अंधारात दोन विद्यार्थिनींना रस्त्यातचं उतरवलं

■ भंडाऱ्याच्या रोहा गावातील संतापजनक प्रकार

गावातून पुढे मुंढरीला जाण्यासाठी या दोन विद्यार्थिनीशिवाय इतर कुठलाही प्रवासी बसमध्ये नव्हता. हेच कारण पुढे करत, संवेदनशीलता विसरलेल्या चालक आणि वाहकानं या दोन्ही विद्यार्थिनींना अंतिम टप्पा येण्यापूर्वीचं रात्रीच्या मिट्ट अंधारात रोहा गावातच खाली उतरवून दिलं.

या घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. रात्रीच्या वेळी विद्यार्थिनींना त्यांच्या नियोजित गावापर्यंत सुरक्षित पोहोचवण्याची जबाबदारी एसटी प्रशासनाची असताना, बसमध्ये इतर प्रवासी नसल्याचं कारण देत त्यांना अर्ध्या रस्त्यात उतरवणं कितपत योग्य आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, रात्रीच्या अंधारात निर्जन ठिकाणी दोन मुलींना सोडून देण्याचा निर्णय घेताना चालक आणि वाहकाने त्यांच्या सुरक्षिततेचा साधा विचारही केला नाही का, असा संतप्त प्रश्न पालकांकडून विचारला जात आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन संबंधित चालक आणि वाहकावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. एसटी महामंडळाकडून सुरक्षित प्रवासाची हमी दिली जात असताना प्रत्यक्षात अशा घटना घडत असतील, तर विद्यार्थिनी आणि महिला प्रवाशांनी प्रवासादरम्यान सुरक्षिततेची अपेक्षा तरी कोणाकडून ठेवायची? असा प्रश्न या घटनेच्या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

कवितेतून सरकारवर घणाघाती प्रहार | साय डोंगरात टोरंटविरोधात एल्गार

वृक्षतोडीविरोधात विद्रोही कवी गरजले

| पाली | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील साय डोंगर परिसरात झालेल्या वृक्षतोडीविरोधात आता साहित्यिक आणि कवीही आक्रमक झाले आहेत. कवितेच्या माध्यमातून सरकारच्या धोरणांवर आसूड ओढत विद्रोही कवींनी पाली येथे सरकारविरोधात जोरदार एल्गार पुकारला. 'अरं सरकारा, दुष्ट सरकारा, तू भस्मासुर हाय!' या पहिल्याच आगरी कवितेने कविसंमेलनाची सुरुवात झाली आणि त्यानंतर संपूर्ण संमेलन सरकारविरोधी कवितांनी चांगलेच तापले.

कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप) रायगड यांच्या वतीने साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल.बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या जाहीर विद्रोही कविसंमेलनाचे



आयोजन करण्यात आले होते. साय डोंगरातील झाडांची मोठ्या प्रमाणावर कत्तल टोरेंट कंपनी अर्थात सरकारच्या माध्यमातूनच झाल्याचा आरोप परिसरात होत असल्याच्या पार्श्वभूमीवर या संमेलनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

जनार्दन सटाणे यांच्या जोशपूर्ण सूत्रसंचालनाने संमेलनातील विद्रोहाची धार अधिक तीव्र केली. कॉम्रेड गोपाळ शेळके यांनी आपल्या कवितेतून सरकारच्या कथित पापी कृत्यांचा जहरी शब्दांत समाचार घेतला. कवयित्री अक्षता गोसावी, नरेश पाटील, वसंत मोहिते, रामदास गायधने, भारती ढकवळ, ॲड. संतोष जोहेकर, ॲड. कल्पना वाळिंजे, जनार्दन सटाणे, अनंत भोईर, दामोदर गायकवाड, शाहीर अनंत पाटील, महेश बार्शी, मारुती बागडे गुरुजी आणि सुरेश पडघेकर यांनी आपल्या कवितांतून वृक्षतोड, पर्यावरणाची हानी आणि सरकारच्या भूमिकेवर परखड भाष्य केले.

या संमेलनाला कॉम्रेड प्रकाश रेड्डी, महाराष्ट्राचे ज्येष्ठ गझलकार अप्पा ठाकूर, प्राचार्य अजित मगदूम, सुभाष लानदे साहेब, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप मुंबईकर, ॲड. सतीश शेळके, समाजसेविका वृषाली मगदूम आणि साहित्यिक मुनघाटे वाशी यांनी उपस्थित राहून संमेलनाला बळ दिले.

दरम्यान, अखिल भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत जोरदार घोषणाबाजी केली. कविसंमेलनानंतर सर्व कवी आणि कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी घोषणा देत साय डोंगरातील वृक्षतोड झालेल्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. कवितेच्या माध्यमातून सुरू झालेला हा आवाज आता प्रत्यक्ष आंदोलनाच्या मैदानातही पोहोचल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॉम्रेड गोपाळ शेळके यांनी केले, तर आभार ॲड. संतोष जोहेकर यांनी मानले.

निवडक



■ (छायाचित्र : नंदकुमार मरवडे)

कोलाड येथे बालदिन उत्साहात साजरा

खांब : रोहा तालुक्यातील जीवनधारा संस्था कोलाड येथे बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी ३६ वाड्यांमधून ६०० बालके उपस्थित होती. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून पंडित जवाहरलाल नेहरूजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वश्रीफळ वाढवून करण्यात आली. तदनंतर पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून वरदायी ट्रस्ट रोह्याच्या वरदाताई तटकरे, कोलाड पोलीस निरीक्षक कोलाड भरत फार्णे, योग शिक्षिका विभा चोरगे, जीवनधारा संचालिका हिल्डा फर्णांडिस, जि.प.सदस्या निधी जाधव,पं.स. उपसभापती संजय मांडलुस्कर, राष्ट्रवादी महिला अध्यक्ष प्रितम पाटील, वरसगाव ग्रा. पं. ग्रामसेवक रवींद्र ठाकूर, कंपनी मॅनेजर गजानन बामणे, लायन्स क्लब कोलाड अध्यक्ष श्याम लोखंडे, सीएसए कॉर्डिनेटर सचिन वाघ, रोहा चर्च धर्मगुरू फादर डॅनियल, स्नेहवर्धिनी कारमेलिता, बीड परेरा आदींसह कोलाड व खांब विभागातील शिक्षक वर्ग उपस्थित होते.



माणगाव येथे क्षत्रिय मराठा भवनाच्या सभागृहाचे लोकार्पण

माणगाव : माणगाव शहरातील क्षत्रिय मराठा समाजाचा समाज मंदिर येणाऱ्या काळात दीपस्तंभाप्रमाणे ठरेल. या समाजाचा वास्तूसाठी मला खारीचा वाटा उचलता आला याचा मनस्वी समाधान होत असल्याचे प्रतिपादन खा. सुनील तटकरे यांनी माणगाव येथील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले. माणगाव येथील क्षत्रिय मराठा भवनाच्या सामाजिक सभागृहाचा लोकार्पण सोहळा रविवार, दि.१५ नोव्हेंबर रोजी खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. या कर्यक्रमास माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष काका नवगणे, मराठा समाजाचे नेते गजानन अधिकारी, ॲड. उदय आंबोणकर, एकनाथ मानकर, क्षत्रिय मराठा समाज माणगाव-तळा तालुका अध्यक्ष मंगेश सावंत, माजी अध्यक्ष राजू मोरे, माणगाव पंचायत समिती उपसभापती मनीषा मालोरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश युवक सचिव दीपक जाधव आदींसह क्षत्रिय मराठा समाज बांधव-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाज बांधव संजोग मानकर व राजू मोरे यांनी करून कार्यक्रमाची उत्साहात सांगता करण्यात आली.



■ (छायाचित्र : उदय कळस)

शेत-पाणंद रस्ते समितीच्या सहअध्यक्षपदी महेश शिर्के

म्हसळा : मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेच्या १९३-श्रीवर्धन विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या सहअध्यक्षपदी म्हसळा येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका मुंबई निवासी अध्यक्ष महेश शिर्के यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा शासन आदेश १३ नोव्हेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आला. खासदार सुनील तटकरे यांच्या शिफारशीनुसार ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. श्रीवर्धनच्या आमदार तथा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे या समितीच्या अध्यक्ष आहेत. यापूर्वी शिर्के यांनी म्हसळा तालुका संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्षपदही सांभाळले आहे. शेतकऱ्यांना बारमाही शेतरस्ते उपलब्ध करून देणे, शेतीमालाची वाहतूक सुलभ करणे आणि ग्रामीण भागातील दळणवळणाच्या समस्या दूर करणे, या योजनेचा मुख्य उद्देश आहे. शिर्के यांच्या नियुक्तीमुळे योजनेच्या अंमलबजावणीला स्थानिक पातळीवर मदत होणार आहे. या नियुक्तीबद्दल खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.



ग्रामीण रुग्णालयाच्या स्वच्छतेसाठी युवासेनेचे श्रमदान

म्हसळा : ग्रामीण रुग्णालयातील सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नसणे आणि कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या यामुळे स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. ही बाब लक्षात घेऊन युवासेनेने पुढाकार घेत १५ नोव्हेंबर रोजी म्हसळा ग्रामीण रुग्णालयात स्वच्छता मोहीम राबविली. युवासेना तालुका अधिकारी कौस्तुभ विलास करडे यांच्या नेतृत्वाखाली युवासैनिकांनी स्वतः श्रमदान करून रुग्णालय परिसराची स्वच्छता केली. यावेळी करडे म्हणाले की, ग्रामीण रुग्णालय हे गरीब आणि गरजू रुग्णांसाठी महत्त्वाचे आधारस्थान आहे. रुग्णालय स्वच्छ ठेवणे ही केवळ प्रशासनाचीच नव्हे, तर प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्याची जबाबदारी आहे. राजकारणापेक्षा समाजाच्या प्रत्यक्ष उपयोगी पडणारे काम महत्त्वाचे असून आरोग्याच्या बाबतीत कोणतीही तडजोड होता कामा नये. 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' या भावनेतून राबविलेल्या या उपक्रमाचे म्हसळा तालुक्यातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

निवडक



वडाळे तलावावर नागरिकांची मांदियाळी

खांदेश्वर : पनवेल शहरातील ऐतिहासिक पेशवेकालीन वडाळे तलाव सध्या नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र बनला आहे. दीपावलीच्या सुट्टीपासून तलाव परिसरात नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. तलावाच्या काठावर नागरिकांना बसण्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था आणि निसर्गरम्य वातावरण यामुळे हा परिसर विरंगुळ्याचे आवडते ठिकाण बनत आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत या तलाव परिसरात ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि तरुणाईची वर्दळ सुरू असते. कुटुंबासह तलाव परिसरात फेरफटका मारणे, निवांत बसून गप्पा मारणे, सेल्फी काढणे आणि थंड हवेचा आनंद घेणे यासाठी नागरिक येथे येत आहेत. दिवाळीच्या रोषणाईनंतरही वडाळे तलावाचे आकर्षण कायम असल्याचे चित्र दिसत आहे. विशेष म्हणजे, रात्रीच्या वेळी तलावाच्या काठावर मोठ्या प्रमाणात मासे पाण्याच्या पृष्ठभागाजवळ येताना दिसत आहेत. हे दृश्य पाहण्यासाठी नागरिक काठावर थांबून निरीक्षण करत आहेत. लहान मुलांसाठी तर माशांचे हे दर्शन विशेष कुतूहलाचा विषय ठरत आहे. दुसरीकडे, वातावरणात थंडीची चाहूल लागल्याने तलाव परिसरात बदकांचे आगमनही झाले आहे. पाण्यावर विहार करणारी बदके पाहण्यासाठी नागरिकांची उत्सुकता वाढली आहे. विशेषतः लहान मुलांना बदकांचे पाण्यातील खेळ पाहण्याचा आनंद मिळत आहे. त्यामुळे वडाळे तलाव परिसरात सध्या निसर्गप्रेमी आणि छायाचित्रप्रेमींचीही वर्दळ वाढली आहे.



पनवेल-कर्जत रेल्वे मार्गाचे काम अंतिम टप्प्यात

खांदेश्वर : पनवेल ते कर्जत या बहुप्रतीक्षित उपनगरीय रेल्वे मार्गाची प्रतीक्षा आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. या मार्गावरून प्रवास करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या पनवेलकरांसह हार्बर रेल्वे मार्गावरील प्रवाशांमध्ये उत्सुकता वाढली आहे. पनवेल रेल्वे स्थानकात पनवेल-कर्जत रेल्वेसाठी स्वतंत्र दोन प्लॅटफॉर्म उभारण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. प्लॅटफॉर्मवर फरशी बसविण्याचे काम वेगाने सुरू असून, प्रवाशांच्या सोयीसाठी स्वयंचलित जिनेही बसविण्यात आले आहेत. पनवेल-कर्जत रेल्वे मार्ग हा नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यातील प्रवाशांसाठी महत्त्वाचा प्रकल्प ठरणार आहे. सध्या पनवेलहून कर्जतपर्यंत जाण्यासाठी रस्ते मार्गाने प्रवास करताना मोठा वेळ खर्च करावा लागतो. मात्र, या उपनगरीय रेल्वे सेवेमुळे प्रवाशांचा प्रवास अधिक जलद आणि सोयीस्कर होणार आहे. या रेल्वे मार्गामुळे सध्याचा जवळपास एक तासाचा प्रवास अवघ्या २० मिनिटांवर येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नोकरी, व्यवसाय, शिक्षण आणि अन्य कामांसाठी दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या प्रकल्पांतर्गत पनवेल ते कर्जतदरम्यान चार नवीन रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. या स्थानकांमुळे मार्गावरील गावांना आणि नव्याने विकसित होत असलेल्या नागरी वसाहतींना उपनगरीय रेल्वेचे जाळे उपलब्ध होणार आहे. विशेषतः पनवेल, कळंबोली आणि परिसरातील प्रवाशांना या मार्गाचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.

तळा-मांदाड मार्गावर कार उलटून अपघात

तळा : तळा-मांदाड मार्गावरील उताराच्या वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार सुमारे ४० फूट खाली जाऊन उलटल्याची घटना घडली. या अपघातात लोखंडी बॅरिकेडचे नुकसान झाले असून, चालकासह कारमधील अन्य एका व्यक्तीला किरकोळ दुखापत झाली आहे. १३ नोव्हेंबर रोजी रात्री ११.४५ वाजण्याच्या सुमारास तारणे गावाच्या हद्दीत तळा-मांदाड रस्त्यावरील उताराच्या वळणावर हा अपघात झाला. आरोपी मारुती सुझुकी अर्टिगा (एमएच-०१ बीवाय-६३१७) ही कार तळा-मांदाड मार्गावरून मांदाडच्या दिशेने घेऊन जात होता. यावेळी रस्त्याचा उतार आणि वळणाकडे दुर्लक्ष करून कार निष्काळजीपणे चालविल्याने ती रस्त्याच्या उजव्या बाजूला गेली. कारने रस्त्यालगत असलेल्या लोखंडी बॅरिकेडला धडक दिली. त्यानंतर कार सुमारे ४० फूट खाली जाऊन उलटली. या अपघातात वाहनाचे तसेच बॅरिकेडचे नुकसान झाले. चालक आणि त्याच्यासोबत असलेल्या वाळवटी, तामरुड येथील व्यक्तीला किरकोळ दुखापत झाली. याप्रकरणी तळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार वाघमारे करीत आहेत.

● चालकासह सहप्रवाशाला किरकोळ दुखापत

मेगा ब्लॉकचा फटका

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

हार्बर रेल्वे मार्गावरील मेगा ब्लॉकचा फटका पुन्हा एकदा पनवेल रेल्वे स्थानकातील प्रवाशांना बसत आहे. रविवारची सुट्टी आणि त्यात भाऊबीजेसाठी गावी गेलेले अनेक प्रवासी आज परतीच्या प्रवासाला निघाल्याने पनवेल रेल्वे स्थानकात प्रवाशांची गर्दी वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले. मात्र, रेल्वेच्या मेगा ब्लॉकमुळे प्रवाशांची गैरसोय होत असून, स्थानक परिसरात प्रवाशांची धावपळ सुरू आहे.

दिवाळी सणानिमित्त अनेक नागरिक आपल्या कुटुंबीयांसह गावी गेले होते. भाऊबीजेचा सण रविवारी साजरा करण्यासाठी काही प्रवाशांनी आजचा दिवस परतीच्या प्रवासासाठी निवडला. त्यामुळे पनवेल रेल्वे स्थानकात सकाळपासूनच प्रवाशांची वर्दळ वाढली आहे. अशा परिस्थितीत मेगा ब्लॉकमुळे रेल्वे सेवा विस्कळीत झाल्याने प्रवाशांना पर्यायी वाहतुकीचा आधार घ्यावा लागत आहे.



- पनवेल स्थानकात प्रवाशांची गर्दी
- रिक्षाचालकांकडून अव्वाच्या सव्वा भाडे

रेल्वेने प्रवास करायचा म्हटले तर मेगा ब्लॉकचा अडथळा आणि रस्त्याने जायचे म्हटले तर वाहतूक कोंडी, अशा दुहेरी संकटात प्रवासी सापडले आहेत. याचाच फायदा घेत काही रिक्षाचालकांकडून जादा भाडे आकारले जात असल्याची प्रवाशांची तक्रार आहे. पनवेल ते वाशी या प्रवासासाठी तब्बल १०० रुपये भाडे सांगितले जात असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.


सणासुदीच्या काळात प्रवाशांची संख्या वाढणार हे माहीत असतानाही रेल्वे प्रशासनाकडून मेगा ब्लॉकचे नियोजन कसे केले जाते, असा सवाल प्रवासी उपस्थित करत आहेत. वारंवार होणाऱ्या मेगा ब्लॉकमुळे सर्वसामान्य प्रवाशांच्या वेळेचा आणि पैशांचा अपव्यय होत आहे. रेल्वेच्या कामांसाठी मेगा ब्लॉक आवश्यक असला, तरी प्रवाशांना त्याचा त्रास कमी व्हावा यासाठी पर्यायी व्यवस्था का केली जात नाही? रिक्षाचालकांच्या मनमानी भाडे आकारणीवर नियंत्रण कोण ठेवणार? आणि सर्वसामान्य प्रवाशांची ही गैरसोय कधी संपणार? असे प्रश्न आता पनवेलकरांकडून उपस्थित केले जात आहेत.

रोषणाई पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

दीपावलीचा सण संपला असला तरी पनवेलकरांच्या उत्साहाचा झगमगाट अद्याप कायम आहे. पनवेलमधील पेशवेकालीन परिसरात महापालिकेच्या वतीने करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई पाहण्यासाठी आजूबाजूच्या महापालिका क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत. रंगीबेरंगी दिव्यांनी उजळून निघालेला परिसर नागरिकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

सायंकाळ होताच या परिसरात ज्येष्ठ नागरिकांपासून महिला, तरुणाई आणि लहान मुलांची वर्दळ वाढत आहे. या गर्दीमुळे परिसरातील छोट्या व्यावसायिकांनाही रोजगाराची संधी मिळाली आहे. खेळणी विक्री करणाऱ्या कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवसभरातील विक्री झाल्यानंतर समाधानाचे हसू दिसत आहे. लहान मुलांना आकर्षित करणारी खेळणी खरेदी करण्यासाठी पालकांचीही गर्दी होत आहे. दिव्यांची रोषणाई, खेळण्यांची खरेदी, झोपाळ्याचा आनंद आणि सेल्फीचा उत्साह अशा वातावरणामुळे पेशवेकालीन पनवेल परिसराला जत्रेचे स्वरूप आले आहे. दिवाळीचा आनंद केवळ घरापुरता मर्यादित न राहता शहराच्या सार्वजनिक ठिकाणीही अनुभवायला मिळत असल्याने नागरिकांकडून कौतुक होत आहे.



जयवंत पाटील यांचे निधन

। नागोठणे । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील चरी-कोपरपाडा येथील रहिवासी आणि सेवानिवृत्त ग्रामविस्तार अधिकारी व कृषी अधिकारी जयवंत मायाजी पाटील (८६) यांचे गुरुवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी सकाळी सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास अपोलो रुग्णालयात अल्पशा आजाराने निधन झाले. दिवंगत जयवंत पाटील हे सामाजिक कार्यकर्ते कै. ह.भ.प. मायाजी गोविंद पाटील यांचे चौथे चिरंजीव आणि नागोठण्यातील मायालक्ष्मी हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुनील पाटील यांचे काका होते.



दिवंगत जयवंत पाटील यांनी गेली ४० वर्ष जिल्हा परिषद रायगड व कृषी विभाग महाराष्ट्र राज्य येथे ग्रामसेवक व कृषी अधिकारी म्हणून काम केले. त्यांनी नागोठणे, मेढा, तळवली, पळस्पा, रोड पाली आदी ठिकाणी सेवा केली. सध्या ते नवीन पनवेल येथे वास्तव्यास होते. त्यांच्या पश्चात सेवानिवृत्त मुख्याध्यापिका असलेल्या पत्नी सुजाता पाटील, दोन विवाहित मुलगे संतोष, सतीश व शिक्षिका असलेल्या कन्या सुवर्णा यांच्यासह मोठा परिवार आहे. कै. जयवंत पाटील यांचे दशक्रिया विधी २१ नोव्हेंबर रोजी हरिहरेश्वर, तर उत्तरकार्य २४ नोव्हेंबर रोजी पनवेल येथे राहत्या घरी होणार असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबियांकडून देण्यात आली आहे.

महाड एमआयडीसी सर्व्हिस रोडवर अतिक्रमण

- बेकायदा पार्किंगमुळे वाहतूक कोंडी; प्रशासनाच्या कारवाईकडे नागरिकांचे लक्ष

। महाड । प्रतिनिधी ।

महाड औद्योगिक वसाहतीम धील सर्व्हिस रोडवर अनधिकृत गॅरेज आणि अवजड वाहनांच्या बेकायदा पार्किंगचा प्रश्न गंभीर बनला आहे. रस्त्यालगत असलेल्या गटारांवरच जेसीबी, डंपर आणि अन्य अवजड वाहने उभी केली जात असल्याने सर्व्हिस रोडची वाहतूक व्यवस्था विस्कळीत होत आहे. यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, प्रशासनाच्या दुर्लक्षाबाबत नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

औद्योगिक क्षेत्रातील वाहनांची सुरक्षित आणि सुरळीत वाहतूक व्हावी, यासाठी निर्माण करण्यात आलेल्या सर्व्हिस रोडचा सध्या अनधिकृत गॅरेजधारकांकडून खासगी वापर होत असल्याचे चित्र आहे. रस्त्याच्या कडेला गॅरेज, थाटून अवजड वाहनांची दुरुस्ती, पार्किंग तसेच साहित्य ठेवले जात असल्याने वाहतुकीसाठी उपलब्ध असलेली जागा कमी होत आहे. परिणामी, वाहनांची वर्दळ वाढताच वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. तर दुसरीकडे गाळेधारकांच्या दुकाना समोर अनाधिकृत टपरीधारकांनी बस्तान वाढवण्याचे चित्र दिसू लागले आहे



विशेष म्हणजे, गटारांवर अवजड वाहनांची पार्किंग केली जात असल्याने गटारांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. यामुळे भविष्यात पावसाळ्यात पाण्याचा निचरा होण्यास अडथळे निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

याप्रकाराची महाड एमआयडीसी प्रशासन, संबंधित ग्रामपंचायत आणि वाहतूक पोलिसांनी तातडीने दखल घेऊन सर्व्हिस रोडवरील अनधिकृत अतिक्रमणे हटवावीत, तसेच बेकायदा पार्किंगवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

वाकण पुलाच्या वळणावर अपघाताचा 'डेंजर स्पॉट'

- महामार्गावरील भरधाव वाहनांमुळे अपघाताची शक्यता

। नागोठणे । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील आणि नागोठण्याजवळील वाकण पुलाच्या पुढे असलेल्या बाळसई गावाकडे जाण्यासाठी असलेल्या वळणावर अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला असून, हे ठिकाण अपघाताचा 'डेंजर स्पॉट' बनले आहे. महामार्गावरून धावणाऱ्या भरधाव वाहनांमुळे येथे मोठ्या अपघाताची दाट शक्यता निर्माण झाली आहे. याशिवाय, बाळसई कडील वळणावर सुरुवातीलाच दोन जीवघेणे खड्डे पडल्याने वाहनचालकांची मोठी तारांबळ उडत आहे. या खड्ड्यात वाहने आदळून लहान-मोठे अपघात होत असून, वाहनांचेही नुकसान होत आहे.



● (छायाचित्र : महेश पवार)

या मार्गावरून दररोज मोठ्या संख्येने प्रवास करणारे बाळसई, वांगणी आणि आमडोशी परिसरातील वाहनचालक, नागरिक व विद्यार्थी सध्या जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. येथील दुभाजक आणि लेन कटिंगच्या ठिकाणी वेग नियंत्रित करण्यासाठी महामार्गाच्या दोन्ही बाजूला रंबलिंग स्ट्रिप तसेच मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील भरधाव वाहनांचा वेग कमी करण्यासाठी वाहनचालकांना सावध करणारे सूचना फलक दोन्ही बाजूला लावणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

स्थानिक नागरिकांकडून वारंवार लक्ष वेधूनही महामार्गावरील या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष होत असल्याने, आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि ठेकेदार कल्याण टोल प्लाझा एखाद्या मोठ्या अपघाताची वाट पाहत आहेत का? असा संतप्त सवाल वांगणी येथील सामाजिक कार्यकर्ते हरिश्चंद्र तेलंगे यांनी उपस्थित केला आहे. प्रशासनाने तातडीने या खड्ड्यांची दुरुस्ती करून वाकण पुलापुढील वळणावर आवश्यक त्या सर्व सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी स्थानिकांकडून होत आहे. उपाययोजना न केल्यास आंदोलनाचा इशारा हरिश्चंद्र तेलंगे यांनी दिला आहे.

एसटी प्रवासात सहा लाखांचे सोन्याचे दागिने लंपास

। खोपोली । प्रतिनिधी ।

एसटी बसमधून प्रवास करताना प्रवाशांचे लक्ष विचलित करून सहा लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. दोन अनोळखी महिलांनी एका लहान मुलाच्या मदतीने पैसे पडल्याचा बनाव करून ही चोरी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

१४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.४० वाजण्याच्या सुमारास पेण ते खोपोली असा प्रवास करणाऱ्या एसटी बसमध्ये ही घटना घडली. फिर्यादी प्रवास करीत असलेल्या एमएच-२० बीएल-३२१७ क्रमांकाच्या बसम ध्ये दोन अनोळखी महिलांपैकी एक महिला फिर्यादी यांच्या सीटवर बसली होती. यावेळी तिच्यासोबत असलेल्या एका लहान मुलाने हातातील चिल्लर फिर्यादी यांच्या सीटखाली टाकली. त्यानंतर पैसे उचलून देण्याच्या बहाण्याने फिर्यादी यांचे लक्ष विचलित करण्यात आले. याच संधीचा फायदा घेत महिलांनी फिर्यादी यांच्या बॅगेतील दागिन्यांच्या बॉक्समधून सहा लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. याप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस हवालदार दबडे करीत आहेत.

कोंडी टळली असती!

। अलिबाग । प्रतिनिधी ।

तालुक्यात अलिबाग ते रेवदंडा या मुख्य रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. दिवाळीच्या सुट्टीचा शेवटचा आठवडा असल्याने हजारो पर्यटक मुरुड, नागावमध्ये आले आहेत. त्यामुळे शेवटचे शनिवार-रविवारपर्यंत रस्त्याचे काम बंद ठेवले असते, तर वाहतूक कोंडी टळली असती. परंतु, एमएसआयडीकडून मनमानी कारभार सुरू आहे.



दुर्बिणीतून चंद्राची कोर पाहण्याची अनोखी संधी

- वडाळे सरोवरावर खगोलप्रेमींची गर्दी

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

दीपावलीच्या उत्सवी वातावरणात फटाक्यांची आतषबाजी, रोषणाई आणि फराळाची मेजवानी यांसोबतच यंदा पनवेलकरांना आकाशातील चंद्राची कोर जवळून पाहण्याची अनोखी संधी मिळाली. पनवेल येथील वडाळे सरोवर परिसरात दुर्बिणीच्या माध्यमातून चंद्राचे दर्शन घडविण्यात आले.

विचुंबे येथे राहणारे अद्वैत पाटील यांनी आणलेल्या विशेष टेलिस्कोपच्या माध्यमातून नागरिकांना चंद्राचे जवळून निरीक्षण करता आले. आकाशात दिसणारी चंद्राची नाजूक कोर दुर्बिणीतून अधिक स्पष्टपणे पाहण्याची संधी मिळाल्याने परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

विशेषतः लहान मुलांमध्ये या उपक्रमाबाबत प्रचंड उत्सुकता दिसून आली. दुर्बिणीतून चंद्राचे दर्शन घेताना मुलांच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि आनंद ओसंडून वाहत होता. अनेक पालकांनीही मुलांसोबत या अविस्मरणीय क्षणाचा आनंद घेतला. आकाशात रोज दिसणारा चंद्र दुर्बिणीतून इतक्या जवळून पाहता येतो, याचा अनुभव अनेकांसाठी नवीन होता. चंद्रावरील खड्डे आणि पृष्ठभागावरील रचना पाहताना नागरिकांनी कुतूहल व्यक्त केले. दिवाळीच्या सुट्टीत मनोरंजनासोबतच विज्ञान आणि खगोलशास्त्राची आवड निर्माण करणारा हा उपक्रम विशेष ठरला. अद्वैत पाटील यांच्या पुढाकारामुळे वडाळे सरोवर परिसरात दिवाळीच्या आनंदाला वैज्ञानिक कुतूहलाची अनोखी जोड मिळाली.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८७८८०२१५१०
- नागाव येथील हॉटेलसाठी कर्मचारी भरती रिक्त पदे : १) नाईट शिफ्टसाठी पुरूष कर्मचारी २) रिसेप्शनिस्ट ३) किचन हेल्पर (महिला) ४) मोरी कामगार ५) कॅप्टन (रेस्टॉरंट) ६) वेटर ७) ऑलराऊंडर कुक (स्वयंपाकी) कामाचे ठिकाण : नागाव, अलिबाग इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. मो. ७५५९१८४६१२
- जमिन तसेच, जुने/नवीन घर विकत/भाड्याने पाहिजे. 7378480151
- पाहिजेत-अलिबागमध्ये ऋतुजा इन्फ्रास्टकचर्स या कंपनी करीता टॅली/जी.एस.टी. कामासाठी मुलगा/मुलगी पाहिजेत संपर्क-९८२३४९२६२६/७९९८६१९१९१ विद्यानगर-अलिबाग
- अलिबाग बिगस्प्लॅश हॉटेलमध्ये रिसेप्शनिस्ट, वेटर, कॅप्टन, हाउसकीपिंग या पदांसाठी उमेदवार पाहिजेत संपर्क : 8483999229
- दुकानगाळा भाड्याने देणे आहे विक्री करणे आहे २० गुंठे जागा अलिबाग पासून २ किमीवर ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२९०/ २२२७६१

डाक विभागाच्या योजना पोहोचविणारे दूत | पोस्टमास्टर रामचंद्र जायभाये यांचे प्रतिपादन

डाकसेवक टपाल विभागाचे सैनिक

। सारळ । प्रतिनिधी ।

ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत शासनाच्या विविध योजना आणि टपाल विभागाच्या सेवा पोहोचविण्यात ग्रामीण डाक सेवकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ग्रामीण डाक सेवक हे केवळ टपाल पोहोचविणारे कर्मचारी नसून, शासनाच्या कल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणारे खरे दूत आणि टपाल विभागाचे सैनिक आहेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र सर्कलचे मुख्य पोस्टमास्टर जनरल श्री. रामचंद्र किसन जायभाये यांनी केले.



रायगड डाक विभागाच्या भेटीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक परिसरात ग्रामीण डाक सेवकांचे विशेष संमेलन आयोजित करण्यात आला होता. या संमेलनाला रायगड विभागातील ग्रामीण भागांतून मोठ्या संख्येने ग्रामीण डाक सेवक उपस्थित होते. यावेळी मुख्य पोस्टमास्टर जनरल जायभाये यांनी ग्रामीण डाक सेवकांशी संवाद साधत त्यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. तुम्ही शासनाच्या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणारे डाक सैनिक आहात. डाक विभागाच्या योजना सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक भविष्य उज्ज्वल करू शकतात. एखाद्या कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्याची ताकद तुमच्या कामात आहे. ग्रामीण भागात आर्थिक क्रांती घडवून आणण्याची क्षमता तुमच्यात आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपले काम केवळ नोकरी म्हणून न पाहता सामाजिक बांधिलकी म्हणून करावे. या योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रत्येक डाक कर्मचाऱ्याने समर्पणाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. ग्रामीण भागातील नागरिकांचा विश्वास संपादन करून टपाल विभागाची प्रतिमा अधिक उंचावण्याचे काम ग्रामीण डाक सेवकांनी करावे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात रायगड विभागाचे अधीक्षक डाकघर राजेश रनाळकर यांनी ग्रामीण डाक सेवकांना सादरीकरणाच्या माध्यमातून टपाल विभागाच्या विविध योजना, त्यांची अंमलबजावणी, कामकाजातील संधी आणि उद्दिष्टपूर्ती याविषयी सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाला डाक निरीक्षक, महाड संतोष मोरे, डाक निरीक्षक, माणगाव गोविंद कदम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारती चोरट यांनी केले. यावेळी संभाजी शेळके, कृष्णा खंदारे, साशंक पाटील, ऋषिकेश सोनी, दीपिका शेडगे, शंकर गाडे, सिद्धेश्वर मुंडे, सचिन क्षीरसागर, कृष्णा नीलकंठ, संकेत बनकर, अदिती पाटील, महेंद्र पाटील, विजय मुजुमले गौरी गिरे, रामचंद्र शेडगे, नामदेव पोटले, अतुल गाडगे, अभय राठोड या ग्रामीण डाक सेवकांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

४२ शाळांना प्रथमच शिक्षक

■ अवघड क्षेत्रातील ५६ विद्यालयांतही शिक्षकांच्या नियुक्त्या

■ विद्यार्थ्यांच्या नियमित अध्यापनाचा मार्ग झाला मोकळा

। रायगड । प्रतिनिधी ।

दुर्गम आणि अवघड क्षेत्रातील शाळांमध्ये नियुक्ती मिळूनही शिक्षक रुजू होत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते. काही शाळांमध्ये एकही शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत होते, मात्र रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षक समायोजन प्रक्रियेमुळे या शाळांना मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यातील ४२ शून्य शिक्षकी शाळांना प्रथमच शिक्षक मिळाले असून, अवघड क्षेत्रातील ५६ शाळांमध्येही गुरुजी रुजू झाले आहेत. त्यामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या नियमित अध्यापनाचा मार्ग मोकळा झाला आहे.

शासनाच्या धोरणानुसार जिल्ह्यात दुसऱ्या टप्प्यात १३४ उपशिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडली. यामध्ये मराठी माध्यमाचे १३२, तर उर्दू माध्यमाचे दोन शिक्षक सहभागी झाले. या प्रक्रियेत शिक्षकांना त्यांच्या पसंतीनुसार शाळा निवडण्याची संधी देण्यात आली. सर्वसाधारण आणि अवघड क्षेत्रातील शाळांची यादी उपलब्ध करून समुपदेशनाद्वारे समायोजन करण्यात आले. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व शिक्षक नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाले आहेत. प्राथमिक शिक्षण विभागाला यापूर्वी ३५१ शिक्षक मिळाले होते. त्यानंतर पवित्र पोर्टलद्वारे आणखी १४५ शिक्षकांची यादी प्राप्त झाली. कागदपत्रांच्या तपासणीनंतर मराठी माध्यमातील १४३ पैकी १३२ शिक्षक पात्र ठरले, तर ११ शिक्षक अपात्र ठरले. उर्दू माध्यमातील दोन शिक्षक पात्र ठरल्याने एकूण १३४ शिक्षकांच्या समायोजनाचा मार्ग मोकळा झाला.

मराठी माध्यमासाठी १३२ शिक्षक

मराठी माध्यमाच्या १३२ शाळांमध्ये शिक्षकांची ३२९ पदे मंजूर आहेत. त्यापैकी यापूर्वी १५० पदांवर शिक्षक कार्यरत होते, तर १७९ पदे रिक्त होती. नव्याने १३२ शिक्षकांची नियुक्ती झाल्याने रिक्त पदांची संख्या ४७ वर आली आहे. विशेष म्हणजे, यामध्ये ४२ शून्य शिक्षकी शाळांचा समावेश असून, या शाळांना प्रथमच शिक्षक मिळाले आहेत. त्यामुळे आतापर्यंत शिक्षकांविना सुरू असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांना नियमित अध्यापनाचा लाभ मिळणार आहे.

उर्दू माध्यमाच्या शाळांनाही आधार

उर्दू माध्यमाच्या चार शाळांमध्ये शिक्षकांची आठ पदे मंजूर असून, ती सर्व रिक्त होती. त्यापैकी दोन पदे नव्याने भरण्यात आली आहेत. त्यामुळे अद्याप सहा पदे रिक्त आहेत. या चारही शाळा शून्य शिक्षकी होत्या. त्यापैकी दोन शाळांना शिक्षक मिळाले आहेत. एकूणच, शिक्षक समायोजनामुळे दुर्गम आणि अवघड क्षेत्रातील शाळांना दिलासा मिळाला असला, तरी उर्वरित रिक्त पदे भरण्याचे आव्हान अद्याप कायम आहे.

खरसई आगरी समाज ग्रामस्थ मंडळाचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा

। म्हसळा । प्रतिनिधी ।

खरसई आगरी समाज ग्रामस्थ मंडळ, मुंबई यांच्या वतीने समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा ताडदेव येथील ऋषी मेहता हॉलमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा आणि मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक संतोष ढाले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. खरसईसारख्या ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी आज पीएचडी, अभियंते, डॉक्टर, वकील आणि इतर विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत आहेत. ग्रामीण पार्श्वभूमी असूनही या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या नेत्रदीपक यशाबद्दल आणि समाजाचा नावलौकिक वाढवल्याबद्दल उपस्थित सर्व मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे डोंगरपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत तिचे मालक श्री. सुभाष शंकर परदेशी यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ (हे. आर)	आकार (रू. पै.)
३४	२/अ	२-१७-००	१=९५

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, तावा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त चार्ज लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक १५/११/२०२६

ॲड. महेश मोतीराम घरे
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

अलिबाग नगरपरिषद ता. अलिबाग, जि. रायगड
जाहीर फेर निविदा सुचना क्रमांक (०५) सन २०२६-२७
(दुसरी वेळ)

अलिबाग नगरपरिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगरपरिषद यांचे भांडार विभागाकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व्यावसायिक /कंत्राटदाराकडून अलिबाग नगरपरिषद कार्यालयाकरीता खुर्च्या पुरविणेबाबत या कामाकरीता द्वी लिफाफा पद्धतीने जाहीर फेर निविदा दरपत्रक ऑफलाईन पद्धतीने दि.१६/११/२०२६ ते २३/११/२०२६ पर्यंत मागविणेत येत आहे.

टिप :- वरील निविदेमध्ये (१) कामे समाविष्ट असून कामाची संपुर्ण माहिती व फेर निविदा फॉर्म साठी नगरपरिषद कार्यालयातील भांडार विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) संपर्क साधावा.

स्वा/-
मुख्याधिकारी,
अलिबाग नगरपरिषद जि. रायगड

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे मांडवणे, ता.कर्जत, जि. रायगड, राज्य महाराष्ट्र येथील शेतजमीन मिळकत, ग्रामपंचायत हद्दीतील, सर्व्हे नं. ५७/३सी, एकूण क्षेत्र ० हे. २६. आर ६०प्रति, ज्याचा सरकारी आकार ०.१७ रुपये आहे, ही मिळकत श्री. जिग्नेश देढिया यांच्या मालकी हक्काची व प्रत्यक्ष तावेवहिवाटीची आहे.

सदर मिळकत श्री. पंढरीनाथ राम बडेकर व श्री. प्रशांत वसंत पडवळ हे खरेदी करीत असून, सदर मिळकतीच्या प्रस्तावित खरेदी व्यवहाराच्या अनुषंगाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, हक्कसंबंध, वारसाहक्क, गहाण, बोजा, कर्ज, कुळहक्क, भाडेपट्टा, ताबा, करार अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध किंवा दावा असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत, त्यासंबंधीच्या आवश्यक कागदपत्रांच्या व पुराव्यांच्या प्रतींसह खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

विहित मुदतीत कोणतीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणताही हक्क, दावा अथवा हरकत नाही असे गृहीत धरून माझे अशील पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

दिनांक : १६/११/२०२६
स्थळ : कर्जत
श्री. पंढरीनाथ राम बडेकर व श्री. प्रशांत वसंत पडवळ
संपर्क तपशील : ९९६९२२८७७४ & ९८१९९६३४०५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. निखील मंगेश चव्हाण आणि सौ. सारिका निखील चव्हाण यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड

भूमापन क्रमांक	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू. पैसे.
१५७५	०-०५-६०	०.११

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला आमचे अशिलांना देण्यात येईल. तसेच मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,

दिनांक :-१५/११/२०२६

ॲड.(डॉ.)दिपक विश्वनाथ नागे
सदनिका क्र. १, तळ मजला,
लक्ष्मी को. ऑप. हौ. सोसायटी, कामत आळी, मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.

माणगावात तालुका काँग्रेस कमिटीतर्फे मेळाव्याचे आयोजन

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुका काँग्रेस कमिटीच्यावतीने आगामी निवडणुका, पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या व पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजा ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य मेळाव्याचे आयोजन सोमवारी (दि.१६) सायंकाळी ४ वाजता कुणबी भवन, निजामपूर रोड, माणगाव याठिकाणी करण्यात आले आहे.

त्यादृष्टीने तालुक्यातील विकासासंदर्भात महत्वाचे प्रश्न, काँग्रेस पक्षाची आगामी दिशा तसेच जनतेच्या समस्या व मत वाचवा देश वाचवा यावर सविस्तर चर्चा या मेळाव्यात करण्यात येणार आहे. तरी या मेळाव्यास सर्वानी आपल्या समर्थकांसह बहूसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माणगाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र सिंह यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

रायगड जिल्ह्यात काँग्रेस कमिटीने जिल्हाध्यक्ष राजा ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आपली पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी मोर्चे बांधणी सुरु केली आहे. काँग्रेसची राज्यात,देशात दीर्घकाळ सत्ता होती. काँग्रेसच्या राजवटीत जनतेला मोकळे श्वास घेता येत होते. विविध लोकाभिमुख योजना काँग्रेसने आपल्या त्या काळात राबविल्या. काँग्रेसचा तो काळ आज जनतेला आठवू लागला आहे. महायुती सरकारच्या राजवटीत जनतेला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. प्रचंड महागाई, बेरोजगारीचे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, स्मार्ट मिटरमुळे भरमसाठ येणारी वीजबिले यासारख्या अनेक गोष्टींमुळे जनता कमालीची नाराज झाली आहे. हि जनता आज काँग्रेसची राजवट होती ती बरी होती असे म्हणू लागली आहे. यासाठी पुन्हा एकदा राज्यातील, देशातील जनतेच्या चेहऱ्यावर आनंद आणण्यासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस कमिटीचे सर्व पदाधिकारी काम करीत आहेत. विविध जिल्ह्यांतून काँग्रेसची मोर्चे बांधणी सुरु आहे. रायगड जिल्ह्यात राजा ठाकूर यांनी आपल्या सर्व काँग्रेसप्रेमी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काँग्रेसची विचारधारा तळागाळातील अगदी शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. आगामी येणाऱ्या सर्वच निवडणुकांची हि काँग्रेस कमिटीची पूर्व तयारी आहे. माणगाव नगरीत बऱ्याच अवधीनंतर काँग्रेस कमिटीचा भव्य मेळावा होत असल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५



तळवलीकरांनी जिंकली मने

। खांब । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील खरबाची वाडी येथे संपन्न झालेल्या श्री.भवानी माता उत्सव प्रसंगी जय हनुमान कलामंच तळवली तर्फे अष्टमी आयोजित नृत्याविष्काराच्या कार्यक्रमाने रसिक प्रेक्षकांची चांगलीच दाद मिळविली.

खरबाची वाडी येथे तुळजा भवानी माता उत्सवानिमित्त विविध धार्मिक, आध्यात्मिक,. सामाजिक तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या उत्सवात जय हनुमान कलामंच, तळवली तर्फे अष्टमी यांच्या कलाकारांनी आपल्या बहारदार कलाविष्कारांनी उपस्थित रसिकांची मने जिंकली. कलामंचाच्या कलाकारांनी हिंदी व मराठी गीतांवरील रेकॉर्ड डान्स तसेच विविध प्रकारचे नृत्याविष्कार सादर करून उपस्थितांची भरभरून दाद मिळवली. कलाकारांच्या आकर्षक वेशभूषा, तालबद्ध नृत्य आणि उत्स्फूर्त सादरीकरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. प्रत्येक सादरीकरणाला रसिकांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

भवानी माता उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांमुळे खरबाची वाडी परिसरात भक्तिमय आणि आनंददायी वातावरण निर्माण झाले होते. धार्मिक परंपरेचे जतन करण्याबरोबरच कला, संस्कृती आणि मनोरंजनाला व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा उत्सव ग्रामस्थांसाठी आनंदाची पर्वणी ठरला.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

RFX	Description	*Esti. Cost*
Tend-35/26-27 7000042119	Work of AMC work of various regular preventative maintenance / emergency and breakdown works and restoration of collapse tower of various 220kV & 100kV lines under EHV Line S/Dn Panvel -1 & 2 for F.Y. 2026- 27.. **Tender Fee Rs. 5000/-+GST**	Limited Rs.125.00 Lakhs (Including all taxes)

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 13.11.2026 at 11 :00 Hrs. to 23.11.2026 up to 11:00 hrs, Opening date:- 23.11.2026 @ 11:30 Hrs.**

For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

Contact Person: The Executive Engineer (Adm)
Mobile No. 8412050202, E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER
EHV (O&M) CIRCLE, PANVEL

जाहीर सूचना

तमाम लोकांस आमचे अशील **सौ. स्मिता कपिल शाह** (लग्नापूर्वीचे नाव **कु. स्मिता रतिलाल बोरा**) यांनी सांगितल्यावरून या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी **(१) श्री. रतिलाल चंदनमल बोरा, (२) सौ. आशा रतिलाल बोरा, (३) श्री. सचिन रतिलाल बोरा, (४) सौ. नेहा सचिन बोरा, (५) कु. किमया सचिन बोरा, (६) कु. आर्या सचिन बोरा, (७) श्री. सतीश केशरचंद बोरा, (८) सौ. पद्मा सतीश बोरा, (९) श्री. निलेश सतीश बोरा, (१०) सौ. तृप्ती निलेश बोरा, (११) कु. ध्रुव निलेश बोरा, (१२) श्री. प्रितेश सतीश बोरा, (१३) सौ. श्रुती प्रितेश बोरा, (१४) कु. इशान प्रितेश बोरा, (१५) कु. मीरा सतीश बोरा (लग्नानंतरचे नाव सौ. मीरा निखिल करमपुरी), (१६) श्री. राजेन्द्र केशरचंद बोरा, (१७) सौ. मीना राजेन्द्र बोरा, (१८) श्री. अमृत राजेन्द्र बोरा, (१९) सौ. रूचिता अमृत बोरा, (२०) कु. नील अमृत बोरा, (२१) कु. युग अमृत बोरा, (२२) कु. स्वप्ना राजेन्द्र बोरा (लग्नानंतरचे नाव सौ. स्वप्ना निखिल नाहटा), (२३) कु. प्रतिमा राजेन्द्र बोरा (लग्नानंतरचे नाव सौ. प्रतिमा देवांश शाह), (२४) श्री. अजित केशरचंद बोरा, (२५) सौ. संगीता अजित बोरा, (२६) श्री. संकेत अजित बोरा, (२७) सौ. अवंती संकेत बोरा, (२८) कु. आरती अजित बोरा (लग्नानंतरचे नाव सौ. आरती प्रेम सिंघवी), (२९) कु. आशा केशरचंद बोरा (लग्नानंतरचे नाव सौ. आशा किशोर नवलखा), (३०) श्री. परेश रमेश चोरडिया, (३१) सौ. सोनाली सचिन भडाळे, (३२) कु. लीला चंदनमल बोरा (लग्नानंतरचे नाव सौ. लीला गौतम लुंकड) व (३३) कु. लता चंदनमल बोरा (लग्नानंतरचे नाव सौ. लता घनश्याम बाफना)** यांचे विरुध्द एकत्र कुटुंबाच्या मिळकती व व्यवसाय यांचे वाटप व स्वतंत्र ताबा, हिशोब व कायम मनाई हुकुम मिळणेकरिता **मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पुणे** यांचे न्यायालयात **स्पेशल सिव्हिल सूट नं. १५९१/२०२६** दाखल केलेला असून सदरचा दावा न्यायप्रविष्ट आहे. सदर दाव्यामध्ये खाली दिलेल्या **परिशिष्टात** वर्णन केलेल्या मिळकती तसेच इतर सर्व मिळकतींचा समावेश आहे.

तरी कोणीही व्यक्तीने सदर मिळकतींच्या किंवा त्यांपैकी कोणत्याही भागाच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणखत, भेटवस्तू, भाडेपट्टा, कर्ज, ट्रस्ट, करार, परवाना, ताबा, सुविधा किंवा इतर कोणत्याही प्रकारे वर नमूद प्रतिवादी किंवा त्यांपैकी कोणाही सोबत अथवा **ज्या संस्थांमध्ये वर नमूद प्रतिवादी हे भागीदार/संचालक/सहयोगी इत्यादी आहेत अशा मे. पुष्पम बोरा व्हेंचर्स एलएलपी सह सर्व संस्था** यांचे सोबत कोणताही व्यवहार करू नये. असा कोणताही व्यवहार केल्यास तो सदर दाव्याच्या निकालाच्या अधीन राहील व **मालमत्ता हस्तांतरण अधिनियम, १८८२ चे कलम ५२** अन्वये बाधित राहील आणि तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असा व्यवहार करणाऱ्या व्यक्तीने तो स्वतःच्या जोखमीवर केला असे समजण्यात येईल व अशा व्यक्तींविरुध्द आमचे अशील आवश्यक ती दिवाणी व फौजदारी कायदेशीर कारवाई करतील. कळावे ही जाहीर सूचना.

परिशिष्ट
मिळकतींचे वर्णन

मे. सब रजिस्ट्रार अलिबाग यांचे हद्दीतील **गाव–ढोकवडे, तालुका–अलिबाग, जिल्हा–रायगड** येथील **मे. पुष्पम बोरा व्हेंचर्स एलएलपी** यांचे नावे असलेल्या जमिनींचा तपशिल खालीलप्रमाणे:–

१) **सर्व्हे नं. ६९२/२** पैकी क्षेत्र **००** हेक्टर **५२.३०** आर; २) **सर्व्हे नं. ६९९** एकूण क्षेत्र **००** हेक्टर **४२** आर; ३) **सर्व्हे नं. ७०१** पैकी क्षेत्र **००** हेक्टर **०७.८०** आर; ४) **सर्व्हे नं. ६८४/२** पैकी क्षेत्र **०५** हेक्टर **११** आर; ५) **सर्व्हे नं. ६८४/३** पैकी क्षेत्र **०५** हेक्टर **११** आर; ६) **सर्व्हे नं. ६८४/४** पैकी क्षेत्र **०५** हेक्टर **११** आर; ७) **सर्व्हे नं. ६८४/५** पैकी क्षेत्र **०५** हेक्टर **११** आर; ८) **सर्व्हे नं. ६८४/६** पैकी क्षेत्र **०५** हेक्टर **११** आर; ९) **सर्व्हे नं. ६८४/७** पैकी क्षेत्र **०४** हेक्टर **९८** आर; १०) **सर्व्हे नं. ६८४/८** पैकी क्षेत्र **०५** हेक्टर **११** आर; ११) **सर्व्हे नं. ६८४/१०** पैकी क्षेत्र **०४** हेक्टर **९७** आर; १२) **सर्व्हे नं. ६८४/११** पैकी क्षेत्र **०५** हेक्टर **११** आर;१३) **सर्व्हे नं. ६८४/१२** पैकी क्षेत्र **०५** हेक्टर **०९** आर; १४) **सर्व्हे नं. ६८४/१३** पैकी क्षेत्र **०५** हेक्टर **०८** आर; १५) **सर्व्हे नं. ६८४/१४** पैकी क्षेत्र **०५** हेक्टर **०६** आर; १६) **सर्व्हे नं. ६८४/१५** पैकी क्षेत्र **०५** हेक्टर **२६** आर; १७) **सर्व्हे नं. ६८४/१६** पैकी क्षेत्र **०४** हेक्टर **८४** आर; १८) **सर्व्हे नं. ६८४/१७** पैकी क्षेत्र **०५** हेक्टर **०५** आर; १९) **सर्व्हे नं. ६८४/१८** पैकी क्षेत्र **०४** हेक्टर **७९** आर; २०) **सर्व्हे नं. ६८४/१९** पैकी क्षेत्र **०४** हेक्टर **७१** आर; २१) **सर्व्हे नं. ६८४/२०** पैकी क्षेत्र **०५** हेक्टर **०३** आर; २२) **सर्व्हे नं. ६८४/२१** पैकी क्षेत्र **०४** हेक्टर **७७** आर; २३) **सर्व्हे नं. ६८४/२२** पैकी क्षेत्र **०४** हेक्टर **७८** आर; २४) **सर्व्हे नं. ६८४/२३** पैकी क्षेत्र **०४** हेक्टर **५९** आर; २५) **सर्व्हे नं. ६८४/२४** पैकी क्षेत्र **०४** हेक्टर **६६** आर.

पुणे. तारीख – १४/११/२०२६

शैलेन्द्र आगलावे (ॲडव्होकेट)
पत्ता – फ्लॅट नं.९, बिल्डींग नं.२, २ रा मजला, न्यू लक्ष्मीनारायण पार्क सोसायटी, बँक ऑफ इंडियाजवळ, कोरेगांव पार्क, पुणे–४११००१. मो. ९८५०९७४३६४

ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड
जाहीर नोटीस

जा.क्र.१०३३/२०२६
दि.१२/११/२०२६

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतराणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	प्रभाग क्रमांक	मालमत्ता क्रमांक	मालमत्तेचे ठिकाण	मालमत्तेचे वर्णन	ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव
१	२	३	४	५	६	७
१	२	१०४९/१०	सुमंगल सह. गृह संस्था	आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ३४७ चौ.फुट	चेतन सुरेश पांचाळ	मेघना सुभाष जुईकर
२	२	२३९	विद्यानगर	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम तळमजला १४१० चौ. फुट १ ला मजला १४१० चौ. फुट एकूण २७०० चौ. फुट	नरेंद्र परमानंद शहा	प्रविणा नरेंद्र शहा
३	२	२१७०/४	ॲकॉन्स प्रिवे सोसा	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ५७१ चौ. फुट	अजित जयराम जाधव	मनस्या मंथन माने
४	२	७४०/१०	नवअलिबाग को.ऑप.हौ. सोसा	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ६०० चौ. फुट	जयसुकलाल धारसी दोशी	मनिषा हरेश्वर कदम
५	४	२१०३/३९	बालाजी विश्वकर्मा सि विंग	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ७ मजला ९४० चौ. फुट	प्रथमेश चंद्रकांत वर्तक	रवि वामन पाटील ज्योती रवि पाटील
६	२	१८१५/९	निलकंठ हाईट	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला ९४० चौ. फुट	किरण रमेश लिगम श्रेया किरण लिगम	आशिष अशोक कदम
७	२	३७७/१/१०	रामेश्वर अपार्ट	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ५५० चौ. फुट	समीर यशवंत पारकर	श्रीमती संपदा समीर पारकर श्री. मानस समीर पारकर
८	४	१७८९/१७	उत्कर्ष वास्तु सी विंग	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला ९७५ चौ. फुट	अर्चना अंकुश मोरे अंकुश अनिल मोरे	अर्चना अंकुश मोरे
९	२	२८-sep	बल्लाळेश्वर नगर रस्ता	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम तळमजला + समोरील पोर्च + पहिला मजला एकूण २३६० चौ. फुट	मिना अशोक कांबळे लिना अशोक कांबळे चैताली चंद्रकांत थळे रोहन अशोक कांबळे	प्रकाश चंद्रकांत म्हात्रे
१०	३	३३०/२/११	पंतनगर रस्ता	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ मजला	शंकर महादेव कोळी विजया शंकर कोळी	श्रीमती विजया शंकर कोळी सौ. प्रिया प्रमोद जोशी
११	१	११२२/३	महेश टॉकीज रामनाथ रस्ता	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ७३५ चौ. फुट	स्मिता अशोक महाडिक अशोक सखाराम महाडिक	स्मिता अशोक महाडिक
१२	५	२१५३/९	सद्गुरू कबीर सागर भवन	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला ५४३ चौ. फुट	श्री सद्गुरू कबीर एन्टरप्रायझेस तर्फे भागीदार श्री. संजय वैजनाथ मेहता रणजितकुमार वैजनाथ मेहता	अनया निलेश पाटील
१३	६	९४९/३	प्रभात दर्शन सोसायटी ए	आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ५७३ चौ. फुट	पुजा दिनेश कुसाळकर शिवम दिनेश कुसाळकर अ.पा.क. आई पुजा दिनेश कुसाळकर, शौर्य दिनेश कुसाळकर, अ.पा.क. पुजा	विक्रांत विनोद थळे
१४	२	१८३०/८	बाळकृष्ण रेसिडन्सी	आर.सी.सी. दुसरा मजला सदनिका	रेणुका नामदेव पवार	शशांक तुलसीदास राठोड
१५	४	२१०४/३	निर्वाणा सह. गृह निर्माण संस्था	आर.सी.सी. पहिला मजला सदनिका ५९३ चौ. फुट	फेतिल रतिलाल पटेल भार्गव रतिलाल पटेल नमिता शिवाजी गायकवाड	अल्हाद चंद्रकांत पाटील
१६	४	२१०३/१०	बालाजी पाल्मस्	आर.सी.सी. पक्के पाचवा मजला	प्रीतम मनोहर घरत मनोहर सा. घरत	जनार्दन द. शिंदे सविता ज. शिंदे
१७	२	२१७०/२०	ॲकॉन्स प्रिवे	आर.सी.सी. पाचवा मजला ५०४ चौ. फुट	अजित ज. जाधव	दानिश आसिफ दणदणे

सही/-
श्री.निलेश लक्ष्मण गावंड
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत चेंढरे ता.अलिबाग

निवडक

पुणे शहरात फुटबॉलचा थरार

पुणे : येरवडा युनिटचे सेलेझियन को-ऑपरेटर्स, सॅक्रिड हार्ट पॅरिश आणि डॉन बॉस्को एज्युकेशनल कॉम्प्लेक्स (येरवडा) यांच्या संयुक्त विद्यमाने व स्व. नेल्सन पॉल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित बॉस्को कप फुटबॉल स्पर्धेत नॉईज बॉईज एफसी, खडकी ब्ल्युज, जीओजी ब आणि स्पोर्टीको एफसी या संघांनी उपांत्य फेरीत धडक मारली. येरवडा येथील डॉन बॉस्को स्कूलच्या मैदानावर पार पडलेल्या उपांत्यपूर्व सामन्यांत या चारही संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात खडकी ब्ल्युज् संघाने मस्का एफसीचा ५-० असा धुव्वा उडवला. खडकी ब्ल्युज्कडून गोकुळ कोळी आणि श्लोक मोरे यांनी प्रत्येकी दोन गोल नोंदवले, तर वॉल्टर सोलोमन याने एक गोल करत संघाचा विजय सुकर केला. दुसऱ्या एका लढतीत नॉईज बॉईज एफसीने स्निग्मय एफसीचा ४-१ असा सहज पराभव केला. नॉईज बॉईजकडून निरंजन खुडे याने दोन गोल केले, तर अक्षय दगडे आणि आदित्य गंगे यांनी प्रत्येकी एकेक गोल करत विजयात मोलाचा वाटा उचलला. स्निग्मय एफसीकडून आदिक विनोज याने एकमेव गोल नोंदवला.अन्य दोन चुरशीच्या उपांत्यपूर्व सामन्यांमध्ये जीओजी ब संघाने फाल्कन्स् एफसी ब संघावर १-० अशी निसटती मात केली. आदित्य पाटील याने केलेला एकमेव गोल जीओजीच्या विजयासाठी निर्णायक ठरला. चौथ्या सामन्यात स्पोर्टीको एफसीने उत्कर्ष क्रीडा मंच संघाचा २-१ असा पराभव करून अंतिम चारमध्ये स्थान निश्चित केले. स्पोर्टीकोकडून अनिकेत देवी आणि सिद्धांत नंदे यांनी प्रत्येकी एक गोल केला, तर उत्कर्ष क्रीडा मंचकडून स्वराज पाटील याने एक गोल नोंदवून पराभवाचे अंतर कमी केले.



लक्ष्य जपान मास्टर्सचा विजेता



जपान : भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने कुमामोटो जपान मास्टर्स २०२६ चे विजेतेपद पटकावले आहे. रविवारी झालेल्या पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात लक्ष्यने जपानच्या जागतिक क्रमवारीतील १५व्या क्रमांकाच्या कोकी वातानाबेला पराभूत केले. एक तास ४ मिनिटे चाललेल्या सामन्यात लक्ष्यने पहिला गेम गमावल्यानंतर दमदार पुनरागमन करत विजेतेपद आपल्या नावावर केले.घरच्या प्रेक्षकांसमोर खेळणाऱ्या कोकी वातानाबेने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला. त्याने पहिला गेम २१-१३ असा जिंकून आघाडी घेतली. दुसऱ्या गेममध्ये लक्ष्यने आपली रणनीती बदलली आणि लांब रॅलींच्या माध्यमातून सामन्यात पुनरागमन केले. जोरदार संघर्षानंतर त्याने हा गेम २१-१८ असा जिंकून स्कोअर १-१ असा बरोबरीत आणला.निर्णायक तिसऱ्या गेममध्ये लक्ष्यने सुरुवातीपासूनच आघाडी कायम ठेवली. त्याने वातानाबेला पुनरागमनाची संधी दिली नाही आणि २१-१४ असा गेम जिंकून चॅम्पियन होण्याचा मान मिळवला.अंतिम सामन्यापूर्वी शनिवारी लक्ष्यने उपांत्य फेरीत इंडोनेशियाच्या जागतिक क्रमवारीतील दहाव्या क्रमांकाच्या अल्वी फरहानचा पराभव केला होता. तीन गेमपर्यंत रंगलेल्या सामन्यात त्याने विजय मिळवला होता. लक्ष्य सेनसाठी हायलो ओपनपूर्वीचा काळ आव्हानात्मक राहिला होता. तो सलग ६ स्पर्धांच्या पहिल्याच फेरीत बाहेर पडला होता. मार्चमध्ये ऑल इंग्लंड ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचल्यानंतर तो मोठ्या विजेतेपदाच्या प्रतीक्षेत होता.नोव्हेंबरच्या सुरुवातीला त्याने हायलो ओपनच्या अंतिम सामन्यात जोनाथन क्रिस्टीचा पराभव करून विजेतेपदाचा दुष्काळ संपवला. आता जपान मास्टर्स जिंकून त्याने सलग दुसरे वर्ल्ड टूर विजेतेपद आपल्या नावावर केले आहे.

भारताने विजयासह मालिका जिंकली

न्यूझीलंडची ७ वर्षांची बादशाहत संपवली, फायनलमध्ये किवींवर २२ धावांनी मात

। ऑकलंड । वृत्तसंस्था ।

टीम इंडियाने पाचव्या आणि अंतिम सामन्यात न्यूझीलंडवर २२ धावांनी मात करत मालिकेवर नाव कोरलं आहे. भारताने न्यूझीलंडसमोर २१० धावांचं आव्हान ठेवलं होतं. त्यामुळे न्यूझीलंड हा सामना जिंकेल, असं चित्र होतं. मात्र भारतीय गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरीच्या जोरावर यशस्वीरित्या २०९ धावांचा बचाव केला. भारताने मालिकेतील पहिले आणि सलग २ सामने जिंकत मालिका विजयाचा दावा मजबूत केला होता. मात्र तिसरा सामना पावसामुळे रद्द झाला. त्यानंतर न्यूझीलंडने चौथ्या सामन्यात विजय मिळवला. त्यामुळे मालिकेतील रंगत वाढली. त्यामुळे पाचवा सामना कोण जिंकणार? याकडे चाहत्यांचं लक्ष होतं. भारतीय फलंदाजांनी पाचव्या सामन्यात निराशा केली. मात्र गोलंदाजांनी धारदार बॉलिंगच्या जोरावर सामना भारताच्या बाजूने खेचून आणला.

भारताने २१० धावांचा पाठलाग करणाऱ्या न्यूझीलंडला १८७ रन्सवर ऑलआऊट केलं. भारताने यासह पाचवा सामना २२ धावांनी जिंकला. भारताने अशाप्रकारे ५ सामन्यांची मालिका ३-१ फरकाने नावावर केली.

भारताच्या बाजूने नाणेफेकीचा कौल लागला. कर्णधार श्रेयस अय्यर याने बॅटिंगचा निर्णय घेतला. मात्र भारताने निराशा केली. न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी भारताला ५० ओव्हरही खेळून दिलं नाही. भारताचा डाव हा ४२.१ ओव्हरमध्ये २०९ धावांवर आटोपला. भारतासाठी ईशान किशन आणि अक्षर पटेल या दोघांनी सर्वाधिक धावा केल्या. दोघांचं अर्धशतक अवघ्या ४ धावांनी हुकलं. दोघांनी प्रत्येकी ४६ धावा केल्या. कर्णधार श्रेयस अय्यर आणि नमन धीर या दोघांनी प्रत्येकी २२-२२ धावा जोडल्या. ऋतुराज गायकवाड याने १८ धावा केल्या. तर मोहम्मद सिराज आणि अर्शदीप या दोघांनी शेवटच्या क्षणी निर्णायक धावा जोडल्या. दोघांनी १४-१४ रन्स केल्या. त्यामुळे भारताला २०९ धावांपर्यंत पोहचता आलं. न्यूझीलंडसाठी कर्णधार मिचेल सँटनर आणि जेकब डफी या दोघांनी प्रत्येकी ३-३ विकेट्स मिळवल्या. तसंच इतरांनी दिलेल्या योगदानामुळे न्यूझीलंडने भारताला ४३ व्या ओव्हरमध्ये ऑलआऊट केलं.



भारताने न्यूझीलंडचा दबदबा संपवला

दरम्यान भारताने या मालिका विजयासह मोठी कामगिरी केली. टीम इंडियाने न्यूझीलंडचा त्यांच्याच घरातील गेल्या ७ वर्षांपासूनचा दबदबा संपवला. न्यूझीलंड मायदेशात गेल्या ७ वर्षांपासून अर्थात २०१९ पासून एकदिवसीय मालिकेत अजिंक्य होती. न्यूझीलंडने या ७ वर्षांत एकूण ११ एकदिवसीय मालिका जिंकल्या. मात्र भारताने पराभूत करत न्यूझीलंडची विजयी घोडदौड थांबवली. भारतानेच याआधी २०१९ साली न्यूझीलंडला मायदेशात पराभूत केलं होतं.

भारतीय गोलंदाज विजयाचे शिल्पकार

न्यूझीलंड टीमची फलंदाजी आणि विजयी लक्ष्य पाहता यजमान सहज जिंकतील, असं वाटत होतं. मात्र भारतीय गोलंदाजांनी आपली कमाल दाखवली. भारतीय गोलंदाजांसमोर एकट्या डीन फॉक्सक्रॉफ्ट याने सर्वाधिक ३१ धावा केल्या. डीन व्यतिरिक्त न्यूझीलंडच्या एकाही फलंदाजाला भारतीय गोलंदाजांसमोर ३० हा आकडा गाठता आला नाही. भारतीय गोलंदाजांनी इतर ९ फलंदाजांना मोठी धावसंख्या करण्याआधीच मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. भारतासाठी एकूण ६ जणांनी बॉलिंग केली. भारतासाठी अर्शदीप सिंह याने सर्वाधिक ३ विकेट्स मिळवल्या. अक्षर पटेल आणि मोहम्मद सिराज या दोघांनी प्रत्येकी २-२ फलंदाजांना मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. तर आकीब नबी, नमन धीर आणि डेब्यूटंट यश ठाकुर या तिघांनी प्रत्येकी १-१ विकेट घेत न्यूझीलंडला ऑलआऊट करण्यात योगदान दिलं.

रायगडचा एक डाव अन् २४१ धावांनी विजय

रोनित चौहानचे नाबाद शतक; दोन्ही डावांत मिळून १४ बळी घेत अष्टपैलू कामगिरी

। पोयनाड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या चौदा वर्षांखालील मुलांच्या संघाने महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित निमंत्रित दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात नांदेड संघावर एक डाव आणि २४१ धावांनी दणदणीत विजय मिळवत स्पर्धेत शानदार सुरुवात केली. रायगड संघाचा कर्णधार आणि अष्टपैलू खेळाडू रोनित चौहान याने नाबाद शतक झळकावण्या सोबतच दोन्ही डावांत मिळून १४ बळी घेत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली.

या सामन्यात रायगड संघाने प्रथम फलंदाजी करताना ९ गडी गमावून ३५६ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला. कर्णधार रोनित चौहान याने नाबाद १०९ धावांची दमदार खेळी करत शतकी योगदान दिले. त्याला शुभंकर माने (७५),ओंकार रक्षिकार (४५) आणि यश ढेडे (३४) यांनी उत्कृष्ट साथ दिली.

रायगडच्या ३५६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना नांदेड संघाचा पहिला डाव अवघ्या ६१ धावांवर आटोपला. रायगडचा कर्णधार रोनित चौहान याने भेदक गोलंदाजी करत ७ फलंदाजांना बाद केले.

पहिल्या डावातील मोठ्या आघाडीमुळे रायगडने नांदेड संघाला फॉलोऑन दिला. मात्र, दुसऱ्या डावातही नांदेडच्या फलंदाजांना विशेष प्रतिकार करता आला नाही. त्यांचा संपूर्ण संघ अवघ्या ५४ धावांवर गारद झाला. दुसऱ्या डावातही रोनित चौहान याने ७ बळी घेत आपल्या अष्टपैलू कामगिरीवर कळस चढवला.

अशाप्रकारे रायगड संघाने हा सामना एक डाव आणि २४१ धावांनी जिंकत स्पर्धेत विजयी सलामी दिली. रोनित चौहानच्या नाबाद शतकासह १४ बळींच्या अविस्मरणीय कामगिरीमुळे रायगडच्या या विजयाची विशेष चर्चा होत आहे.

या दणदणीत विजयाबद्दल संघाचे प्रशिक्षक सुनील सरगर तसेच रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी संपूर्ण संघाचे अभिनंदन करून पुढील सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या.

राज्यस्तरीय आट्यापाट्या स्पर्धा

मुलांमध्ये जळगाव तर मुलींमध्ये अमरावती अजिंक्य



। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा आट्यापाट्या संघटना व श्रीवर्धन तालुका आट्यापाट्या असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथील क्रीडा संकुलात आयोजित ३७ व्या मुले व मुलींच्या कनिष्ठ गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला.

१२ ते १४ नोव्हेंबर या कालावधीत पार पडलेल्या या स्पर्धेत राज्यभरातून मुलांचे २६, तर मुलींचे २२ असे एकूण ४८ संघ सहभागी झाले होते.

अंतिम सामन्यांमध्ये जळगाव आणि अमरावतीच्या संघांनी बाजी मारत विजेतेपदावर आपले नाव कोरले. मुलांच्या गटात जळगाव जिल्ह्याने सलग सहाव्यांदा विजेतेपद पटकावण्याचा मान मिळवला. धाराशिव संघाने द्वितीय, रायगडने तृतीय, तर वाशिम संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. मुलींच्या गटात अमरावती संघाने विजेतेपद मिळवत सलग तिसऱ्यांदा विजेतेपदाची हॅटट्रिक साधली. धाराशिवने द्वितीय, जळगावने तृतीय, तर परभणी संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला. मुलांच्या गटात सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार जळगावच्या साहिल बिडकर याला मिळाला. उत्कृष्ट बचावपटू म्हणून धाराशिवच्या शिवम डोंगरे आणि रायगडच्या नील सातामकर यांची निवड झाली.

मुलींच्या गटात सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार अमरावतीच्या खुशी कडू हिला, तर उत्कृष्ट बचावपटू म्हणून धाराशिवच्या कल्याणी घुले आणि रायगडच्या सान्वी गायकर यांना गौरविण्यात आले. राज्यभरातील खेळाडूंचा सहभाग, सर्वपक्षीय सहकार्य आणि उत्तम नियोजनातून बोर्ली पंचतनमध्ये पार पडलेल्या या क्रीडा सोहळ्याने श्रीवर्धन तालुक्याच्या क्रीडा क्षेत्राला नवी ओळख मिळवून दिली.

जलकन्या प्रियांशीचे प्रशिक्षकाअभावी पदक हुकले

। चिरनेर । प्रतिनिधी ।

अवघ्या १४ व्या वर्षी जागतिक स्तरावर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवत भारतीय विंडसर्फर प्रियांशी पाटील हिने डकार २०२६ युथ ऑलिम्पिक गेम्समध्ये ऐतिहासिक कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, स्पर्धेच्या पहिल्या दिवशी झालेल्या शर्यतीत प्रियांशीने थेट तिसऱ्या क्रमांकावर झेप घेत पदकाच्या आशा पल्लवित केल्या होत्या. मात्र, इतर देशांच्या खेळाडूंसाठी अनुभवी प्रशिक्षकांची फौज असताना प्रियांशीकडे स्वतःचा कोच नव्हता. तांत्रिक मार्गदर्शनाअभावी तिला पुढील शर्यतींत काहीशी घसरण पत्करावी लागली, तरीही हार न मानता तिने जगातून एकूण ६ वे स्थान (टॉप-१०) पटकावून भारताचे नाव उंचावले आहे.



डकारमधील युथ ऑलिम्पिकच्या रणांगणात उतरलेली प्रियांशी ही भारतातील सर्वात तरुण खेळाडूंपैकी एक आहे. सर्वात कमी वयाची खेळाडू प्रियांशी आहे. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी तिने आपल्या कौशल्याची चुणूक दाखवत तिसरे स्थान मिळवले होते. परंतु, पुढील दिवसांत बदलत्या हवामानानुसार रणनीती आखण्यासाठी आणि तांत्रिक चुका सुधारण्यासाठी तिच्यासोबत कोच नव्हता.

इतर खेळाडूंना त्यांचे कोच पाण्यातील प्रत्येक हालचालीवर मार्गदर्शन करत असताना प्रियांशी मात्र मैदानात एकटीच लढत होती. वाऱ्याचा वेग अचानक वाढणे आणि पुढच्याच क्षणी शून्यावर येणे अशा कठीण परिस्थितीत कोचच्या अभावा मुळे ती क्रमवारी थोडी खाली घसरली तरी तिने खचून न जाता स्वतःच्या बुद्धीने लढा देत पहिल्या १० खेळाडूंमध्ये आपले स्थान कायम राखले. या स्पर्धेत इटलीच्या लॉरा ग्रासो कास्टाग्नेटा हिने सुवर्ण स्पेनच्या ओलिविया सांचेज हिने रौप्य तर चीनच्या वू झियान हिनिकांचे पदक जिंकले.

प्रियांशी चा हा प्रवास थक्क करणारा आहे डिसेंबर २०२४ मध्ये अवघ्या २ वर्षांपूर्वी तिने विंडसर्फिंगचे धडे गिरवायला सुरुवात केली. सुरुवातीला तिला समुद्राच्या पाण्याची खडकांची भीती वाटायची पण भावाच्या प्रोत्साहनामुळे तिने पाण्यात पाऊल ठेवले आणि पाहता पाहता या खेळाच्या प्रेमात पडली .स्वप्न पाहण्यासाठी वयाचे बंधन नसतं फक्त सेल कर डोकं वापर आणि खेळ कर असा संदेश तिने आपल्या कृतीतून दिला.

निहाल सकपाळला कराटेत सुवर्णपदक

। तळा । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यातील खैराट गावचा सुपुत्र निहाल सिद्धार्थ सकपाळ याने कराटे क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण भरारी घेतली आहे. त्याने आपल्या यशाने कुटुंबासह गावाचे आणि जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

निहाल याने मे २०२४ मध्ये मलेशिया आणि सिंगापूर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत एक सुवर्णपदक आणि एक रौप्यपदक पटकावले होते. त्यानंतर १ नोव्हेंबर २०२६ रोजी गोवा येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेतही त्याने एक सुवर्णपदक आणि एक रौप्यपदक मिळवून आपल्या यशात आणखी भर घातली आहे. विशेष म्हणजे, निहालने आतापर्यंत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळून एकूण ३२ ट्रॉफी जिंकण्याचा मान मिळवला आहे. तसेच चेन्नई येथे होणाऱ्या राष्ट्रीय राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. लहानपणापासूनच हुशार व खेळाची आवड असणाऱ्या निहालने वयाच्या अवघ्या १२व्या वर्षी हे यश मिळविले आहे.



आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक स्पर्धा

शनाया कोठावळेची सुवर्ण कामगिरी

। उरण । प्रतिनिधी ।

आंतरराष्ट्रीय स्तरावरील जिम्नॅस्टिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करताना नवी मुंबईतील प्रतिभावान युवा जिमनॅस्ट शनाया भावेश कोठावळे हिने नेत्रदीपक कामगिरी करत २ सुवर्ण आणि २ रौप्य अशा एकूण ४ पदकांची लयलूट केली आहे.

थाई कॅनेडियन कम्युनिटी स्पोर्ट्सच्या वतीने १४ आणि १५ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बांबी गेम इन्व्हिटेशनल मीटमध्ये तिने हे घवघवीत यश संपादन केले.

स्पोर्ट्स पार्क क्लब आणि शाळेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शनायाने मुलींच्या लेव्हल २ गटात सहभाग नोंदवला होता. स्पर्धेतील अत्यंत अटीतटीच्या फेऱ्यांमध्ये तिने जिम्नॅस्टिकच्या चारही प्रकारांत आपले कौशल्य सिद्ध केले. यामध्ये व्हॉल्ट प्रकारात ९.३५ गुणांसह सुवर्णपदक आणि बीम प्रकारात ८.५ गुणांसह सुवर्णपदक पटकावत तिने अव्वल स्थान गाठले. तसेच, बार्स प्रकारात ८.२ गुण आणि फ्लोअर प्रकारात ८.२ गुण मिळवत दोन रौप्यपदकांवर आपले नाव कोरले. आयोजक संस्थेचे अध्यक्ष रॉनी युंग आणि परीक्षक समितीचे अध्यक्ष साकसित सुवान्सा यांच्या स्वाक्षरीने तिला या यशाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. शनायाच्या या देदिप्यमान यशामुळे कोठावळे कुटुंबासह संपूर्ण देशाचा नावलौकिक उंचावला असून, क्रीडा प्रेमींकडून आणि सर्वच स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



भारताच्या खात्यात २ सुवर्ण आणि २ रौप्य पदकांची भर

महाराष्ट्र पोलीस दलातील नवी मुंबई येथे डीवायएसपी पदावर निवृत्त झालेले रामकृष्ण कोठावले यांच्या मुलाची मुलगी शनाया कोठावले आहे

८० षटकांची अनोखी स्पर्धा | स्पर्धेकडे जगाचं लक्ष

क्रिकेटच्या इतिहासात मुले-मुली एकाच संघात

। मुंबई । प्रतिनिधी ।

आतापर्यंत तुम्ही मुलांचं क्रिकेट पाहिलं, मुलींचं क्रिकेटही पाहिलं. पण मुलं आणि मुली एकाच संघातून, एकत्रखेळून एकाच विजयासाठी प्रयत्न करताना पाहिलंय का? क्रिकेटच्या इतिहासात असं पहिल्यांदाच घडणार आहे! कोलंबो येथील सिंहली स्पोर्ट्स क्लब येथे १४ ते २९ नोव्हेंबरदरम्यान क्रिकेटमधील पहिली - स्पर्धा रंगणार आहे. ८० षटकांच्या स्पर्धा या अनोख्या प्रकाराचं नाव आहे.

या स्पर्धेसाठी जगभरातून १३ ते २१ वयोगटातील १६० युवा क्रिकेटपटूंची निवड केली जाणार असून, त्यांची विभागणी ४ खंडीय संघांमध्ये केली जाईल. प्रत्येक संघात ४० खेळाडू असतील. त्यापैकी २० मुली आणि २० मुलं असतील. मुलं आणि मुली एकाच संघातून खेळतील आणि दोघांनी मिळून केलेल्या धावांच्या आधारे संघाचा निकाल ठरेल. या स्पर्धेचा खेळण्याचा प्रकारही तितकाच वेगळा आहे. प्रत्येक सामना एकाच दिवसात खेळवला जाईल. त्यात लाल आणि पांढरा अशा दोन्ही चेंडूंचा वापर केला जाईल. पहिली ४० षटकं दिवसाच्या प्रकाशात पांढऱ्या कपड्यांमध्ये लाल चेंडूने खेळली जातील, तर उर्वरित ४० षटकं झगमगत्या प्रकाशझोतात रंगीत कपड्यांमध्ये पांढऱ्या चेंडूने खेळली जातील.



दोन्ही संघांना दोनदा फलंदाजी करण्याची संधी मिळेल आणि पहिल्या सत्रातील धावा दुसऱ्या सत्रातील धावांमध्ये जोडल्या जातील.

या स्पर्धेचा सर्वात खास नियम म्हणजे! आयोजकांच्या मते, या नियमानुसार मुलींनी केलेल्या धावा ठरवतील की प्रकाशझोतात खेळल्या जाणाऱ्या दुसऱ्या सत्रात मुलांचा विजय होणार की नाही. त्याचप्रमाणे, मुलांनी केलेल्या धावा मुलींच्या विजयासाठी निर्णायक ठरतील. म्हणजेच, या स्पर्धेत कोणाचाही विजय स्वतंत्र नसेल, तर विजय दोघांचा असेल!

स्पर्धेचे संस्थापक गौरव बहिरवानी यांच्या मते, समानतेचं हे तत्त्व केवळ खेळाच्या नियमांपुरतं मर्यादित राहणार नाही, तर सामन्यांच्या प्रक्षेपणातही मुलं आणि मुलींना समान वेळ दिला जाईल. एबी डिव्हिलियर्स, मॅथ्यू हेडन आणि सर क्लाइव्ह लॉईड यांचा या स्पर्धेच्या सल्लागार मंडळात समावेश आहे. जागतिक निवड समितीच्या अध्यक्षपदी दिल्लीतील प्रसिद्ध प्रशिक्षक राजकुमार शर्मा आहेत, तर स्पर्धेच्या संचालनाची जबाबदारी माईक फोर्डहॅम यांच्याकडे आहे.

राष्ट्रीय कुडो कराटे स्पर्धा

शिवोम राऊत यांचे देदिप्यमान यश



। भाकरवड । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील श्रीगाव येथील शिवोम राऊत यांनी अहमदाबाद येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्टेडियममध्ये पार पडलेल्या राष्ट्रीय कुडो कराटे या खेळ स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर बेचाळीस किलो व तेरा वर्षा खालीला गटात द्वितीय क्रमांक पटकावून रौप्य पदकास गवसणी घातली आहे.

सध्या कुमार सिओम मुंबई येथे सहावीच्या इंग्लिश माध्यम वर्गात शिकत असून त्यांनी वर्गात अव्वल दर्जा ठेवला आहे. या स्पर्धेच्या राज्यस्तरीय चाचणी स्पर्धेमध्ये त्यांनी प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला होता. याव्यतिरिक्त कुमार शिवोम याला भजनी व पॉप गायकीमध्ये विशेष आवड असून विविध संगीत वाद्य वाजवणे हा छंद अजूनही जोपासत आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)